रविवार, २१ नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १२४
www.ramprahar.com


# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

**अंतरंग**

राज्य सरकारची दडपशाही; एसटी कर्मचाऱ्यांची धरपकड/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थप्रहर/४
पेणमध्ये आज भव्य पॉवर लिफ्टिंग स्पर्धा/६

## एसटी संपावर तोडगा निघेना; कर्मचारी भूमिकेवर ठाम



**मुंबई :** राज्यभरात मागील २० दिवसांपासून एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू आहे. एसटी महामंडळाचे शासनात विलीनीकरण करावी ही कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. संपामुळे राज्यातील बसेस सध्या संथ गतीने सुरू आहेत. त्यातच मुंबईतील आझाद मैदानावर कर्मचाऱ्यांनी ठिय्या दिला आहे. दरम्यान, एसटी संपावर मार्ग काढण्यासाठी मुंबई सेंट्रल येथील महामंडळाच्या मुख्यालयात परिवहनमंत्री अनिल परब यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीला महाराष्ट्र राज्य कनिष्ठ श्रेणी एसटी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजय गुजर, कर्मचारी संघटनेच्या वतीने हायकोर्टात बाजू मांडणारे अॅड. गुणरत्न सदावर्ते हेदेखील उपस्थित होते, मात्र याही बैठकीत सन्मानजनक तोडगा निघू शकला नाही. महाविकास आघाडी सरकारसोबत आणखी एक बैठक निष्फळ ठरल्यानंतर संपकऱ्यांनी आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# पनवेल महापालिकेचा केंद्र सरकारकडून सन्मान; स्वच्छताविषयक पुरस्कार प्रदान



**पनवेल : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत संपूर्ण देशभर स्वच्छ सर्वेक्षण २०२१ राबविण्यात आले होते. त्या अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण, स्वच्छता मित्र सुरक्षा चॅलेंज आणि कचरामुक्त शहरांसाठीचा पुरस्कार शनिवारी (दि. २०) राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि केंद्रीय सचिव दुर्गाशंकर मिश्रा यांच्या उपस्थितीमध्ये केंद्रीय नागरी विकास व गृहनिर्माणमंत्री हरदीपसिंग पुरी यांच्या हस्ते पनवेल महानगरपालिकेला सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

नवी दिल्लीमधील विज्ञान भवनात स्वच्छ अमृत महोत्सवामध्ये पनवेल महापालिकेच्या वतीने महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर जगदिश गायकवाड, सभागृह नेते परेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, नगरसेवक, उपायुक्त सचिन पवार, गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते आदींनी हा पुरस्कार स्वीकारला. पनवेल महापालिकेने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत १ ते १० लाख लोकसंख्येच्या शहरांमध्ये देशात २७वा, तर राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२१मध्ये अत्यंत उत्साहाने सहभागी होत या वर्षी पनवेल महापालिका क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्यात आल्या. स्वच्छता आणि पर्यावरण रक्षण-संवर्धनाचे संदेश प्रसारित करणाऱ्या आकर्षक रंगचित्रांनी सजलेली भिंतीचित्रे, शहरातील शौचालये शोधण्यासाठी गुगल मॅपचा वापर, सायकल रॅली, विविध टाकाऊ वस्तूंसाठी रिड्युस, रियुझ, रिसायकलचे स्वच्छतारथ महापालिकेने बनवले आहेत. महापालिकेच्या लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारीवृंद व स्वच्छतामित्रांनी केलेले स्वच्छताविषयक काम आणि त्याला नागरिकांचा लाभलेला सकारात्मक प्रतिसाद यामुळे पनवेल महापालिकेस स्वच्छतेचा हा बहुमान प्राप्त झालेला आहे. याबद्दल सर्वांचे अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

# राज्यात आता दारू स्वस्त

## ठाकरे सरकारने केली उत्पादन शुल्कात कपात



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ठाकरे सरकारने आयात केलेल्या स्कॉच व्हिस्कीवरील उत्पादन शुल्कात ५० टक्के कपात केली आहे. त्यामुळे राज्यातील त्याची किंमत इतर राज्यांच्या बरोबरीने झालीय, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. या संदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

स्कॉच व्हिस्कीवरील उत्पादन शुल्क हे खर्चाच्या ३००वरून १५० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. आयात केलेल्या स्कॉचच्या विक्रीतून महाराष्ट्र सरकारला वार्षिक १०० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. या कपातीतून सरकारचा महसूल २५० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, कारण त्यामुळे एक लाख बाटल्यांवरून २.५ लाख बाटल्यांची विक्री वाढेल, असे अधिकाऱ्याने सांगितले.

उत्पादन शुल्कात कपात केल्याने महाराष्ट्रात आयात होणाऱ्या व्हिस्कीच्या किमती कमी झाल्यात. त्यामुळे राज्याच्या महसुलात वाढ होईल. सध्या एका दिवसात एक लाख बाटल्या विकल्या जातात. शुल्क कमी केल्यामुळे बाटल्यांची विक्री अडीच लाखांवर पोहचू शकते.

महाराष्ट्रासह संपूर्ण देशात सरकारला दारूपासून सर्वाधिक महसूल मिळतो. महाराष्ट्रात आयात व्हिस्कीच्या दरात कपात करण्यात आली आहे. राज्य सरकारने उत्पादन शुल्कात ५० टक्के कपात केली आहे. त्यामुळे व्हिस्कीच्या किमतीत कमालीची घट झाली आहे. आता महाराष्ट्रातील जनतेला कमी किमतीत आयात स्कॉच मिळू शकणार आहे.

# विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहकार्य करणार

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही; गुणवंतांचा सत्कार





(अधिक छायाचित्रे पान २ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुम्ही सर्व आपापल्या आयुष्यामध्ये पुढे प्रगती करीत राहा. त्या दृष्टिकोनातून वाटचाल करीत असताना आमचे जे सहकार्य लागेल त्यासाठी आम्ही तुमच्यासोबत राहू, अशी ग्वाही भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे दिली. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते.

शैक्षणिक क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा शुक्रवारी (दि. १९) पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या मंडळाची स्थापना झाल्यापासूनच वह्या वाटप, गणवेश वाटप, शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच शिक्षणासाठी आर्थिक मदत यासारखे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी सहकार्य केले जाते. त्यालाच अनुसरून ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात सर्वोतम कामगिरी केली आहे अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला होता.

सत्कार सोहळ्याला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष तथा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील तसेच श्यामनाथ पुंडे व अन्य उपस्थित होते.

या वेळी रूपेश दुर्गे, वृषाली फंगाल, जयेश कोळी, सुहास म्हात्रे, आदित्य पुंडे, डॉ. समीर आगलावे, प्रिया आवास्कर, मोहनिश मिस्त्री, अनिकेत बहाडकर, अमन शेख, श्वेता तुपे, पूजा पुगावकर, अश्विन सातपुते, महेश कर्णे, साजन खंडेलवाल, आयेशा खान, मानसी रहाणे, अश्विनी कोळी, गणेश माळी, नितीन माळी, मनोज ठाकूर, डॉ. आदिती फडके, अक्षता गीध या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. काही विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांच्या पालकांनी स्वीकारला.

आग्रा येथे स्पोर्ट्स फिजिकल फिटनेस ऑफ बोर्ड उत्तर प्रदेश व इंडिया युनिव्हर्सिटी यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा पैलवान व सीकेटी कॉलेजचे क्रीडा शिक्षक रूपेश पावशे यांनी सुवर्णपदक पटकविले. याबद्दल त्यांचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला.

## निवडक

### मनी लॉण्डरिंगप्रकरणी भावना गवळींना ईडीकडून पुन्हा समन्स

**मुंबई :** मनी लॉण्डरिंगप्रकरणी शिवसेना खासदार भावना गवळी यांची सध्या सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) चौकशी सुरू आहे. आता पुन्हा एकदा ईडीकडून गवळींना समन्स बजावण्यात आले आहे. २४ नोव्हेंबरला त्यांना चौकशीसाठी हजर राहण्यास तिसऱ्यांदा सांगण्यात आले आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी हा गैरव्यवहार उजेडात आणला होता.

### ताडोबा प्रकल्पात वाघिणीच्या हल्ल्यात वनरक्षकाचा मृत्यू

**चंद्रपूर :** ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील माया वाघिणीच्या हल्ल्यात एका महिला वनरक्षकाचा मृत्यू झाला आहे. स्वाती ढुमणे (वय ४३) असे या महिलेचे नाव असून सध्या सुरू असलेल्या व्याघ्रगणनेच्या कामासाठी जंगलात गेल्या असताना शनिवारी (दि. २०) सकाळी त्यांच्यावर हा हल्ला झाला. साधारण अर्धा तास वाट बघूनदेखील वाघीण आपल्या जागेवरून न हलल्याने ढुमणे यांनी रस्त्याच्या बाजूला उतरून जंगलातून पुढे जाण्याचा निर्णय घेतला आणि तिथेच घात झाला.

# कृषी कायदे रद्द करणे हा मनाचा मोठेपणा!

## फडणवीसांकडून पंतप्रधान मोदींचे कौतुक



**नाशिक : प्रतिनिधी**

मोदी सरकारने तिन्ही कृषी कायदे मागे घेतले जाणार असल्याची घोषणा केली आहे. यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे. पंतप्रधान मोदींनी कृषी कायदे मागे घेऊन मनाचा मोठेपणा दाखवला आहे, असे फडणवीस यांनी म्हटलेय. या वेळी त्यांनी थेट नाव न घेता काँग्रेसला टोला लगावला. ते नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

फडणवीस म्हणाले की, टीका करणारे टीका करीत असतात. काम करणारे काम करीत असतात. देशाच्या पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेतला होता, पण काही लोक त्याला सातत्याने विरोध करीत राहिले. त्यामुळेच पंतप्रधानांनी काल स्पष्टपणे सांगितले की, काही लोकांना मी पटवू शकलो नाही. म्हणून मी हे कायदे परत घेतोय.

या निर्णयाबाबत पुढे बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, मला असे वाटते लोकशाहीमध्ये अशा प्रकारचा निर्णय घेण्याचा मोठेपणा फार कमी लोक दाखवतात. तो मोदीजींनी दाखवलेला आहे. त्यामुळेच या संदर्भात जे टीका करताहेत त्यांनी शेतकऱ्यांकरिता कधी काहीच केलेले नाही. जे काही केले आहे ते मोदीजींनी केले आहे. आज किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून ज्या प्रकारे शेतकऱ्यांना मदत मिळतेय ती पाहा. एकट्या महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांना नऊ हजार कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये किसान सन्मान योजनेमधून गेलीय.

आधीच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात जे कृषी क्षेत्राचे बजेट ३५ हजार कोटींचे होते ते आता मोदीजींच्या काळात एक लाख ३५ हजार कोटींचे झाले आहे. त्यामुळे टीकाकारांना जनताच उत्तर देईल, असेही फडणवीस म्हणाले.

## महाड आगारातील एसटी कर्मचाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**महाड : प्रतिनिधी**

येथील एसटी आगारात शनिवारी (दि. २०) सकाळी एका कर्मचाऱ्याने झाडाला गळफास लावून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना सुरक्षारक्षकाच्या लक्षात येताच त्याने तातडीने हालचाल करून या कर्मचाऱ्याचा जीव वाचवला.


राज्यात एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू असून बससेवा तुरळक आहे. अशातच शनिवारी सकाळी ८ वाजता महाड आगारातील एसटीचालक संदीप तावरे (वय ३५, मूळ रा. सातारा) याने आगाराच्या छपरावर चढून भिंतीलगत असलेल्या झाडाच्या फांदीला उपरणे बांधून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना शेजारील सुरक्षारक्षकाच्या लक्षात येताच त्याने धाव घेत कर्मचाऱ्याला या फासातून सोडवले. महाड आगाराचे प्रभारी प्रमुख शिवाजी जाधव यांनी पोलिसांना या घटनेची कल्पना दिली आहे.

## पाचवीपर्यंत शाळा सुरू करण्यास टास्क फोर्सचा विरोध

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शहरी भागात आठवी ते बारावी आणि ग्रामीण भागात पाचवी ते बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत. त्यानंतर राज्यात पहिलीपासूनच्या शाळा सुरू करण्याच्या हालचाली सरकारकडून सुरू असताना कोरोना टास्क फोर्स मात्र यासाठी सध्या तयार नाहीए. टास्क फोर्सचे प्रमुख डॉ. संजय ओक यांनी याबद्दल स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

मुले जवळपास १८ महिने शाळा बाहेर आहेत आणि याच्या दुष्परिणामांची मला पूर्ण कल्पना आहे, मात्र लहान मुले कोविडला बळी पडणार नाहीत याची काळजी टास्क फोर्सला आहे. म्हणूनच लसीकरण सुरू व्हावे यासाठी विनंती करणार आहे. जोपर्यंत विद्यार्थ्यांचे लसीकरण होत नाही तोपर्यंत शाळा सुरू करणे योग्य ठरणार नाही, असे डॉ. ओक म्हणाले. (सविस्तर वृत्त पान २ वर..)



पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
रविवार, दि. २१ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१४ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

**कोव्हॅक्सिन**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

# ओबीसी जागर अभियान रथयात्रेचा रायगडात शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडी सरकारने जाणीवपूर्वक ओबीसींच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्याचा निषेध करून या सरकारच्या झारीतील शुक्राचार्याची भूमिका उघड करण्यासाठी आणि ओबीसी समाजाला जागृत करण्याकरिता भाजपच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ओबीसी जागर अभियान रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील ओबीसी जागर यात्रेला सुरुवात झाली. (पान २ वर..)

## पनवेलमध्ये आजपासून तीन दिवस जागर

**पनवेल :** ओबीसी जागर अभियानांतर्गत भाजप उत्तर रायगड ओबीसी मोर्चातर्फे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात जनजागर रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पनवेलमध्ये तीन दिवस ओबीसी आरक्षणासंदर्भात जागर होणार आहे.

या रथयात्रेला रविवारी (दि. २१) सकाळी १०.३० वाजता पनवेल भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात सुरुवात होणार आहे. पुढे मार्गक्रमण करीत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, खांदा कॉलनीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवीन पनवेल शिवा कॉम्प्लेक्स, रेल्वेस्थानकाजवळील बिकानेर कॉर्नर; सोमवारी (दि. २२) सकाळी १०.३० वाजता सुकापूर ग्रामपंचायत, त्यानंतर नेरे नाका, लोणीवली, बेलवली, शेडुंग नाका, तर मंगळवारी (दि. २३) सकाळी ११ वाजता चिंध्रण, पुढे महालुंगी, मोर्बे, खानाव, वाकडी, शांतीवन फाटा आणि शेवटी आकुर्ली स्टॉप येथे रथयात्रा होऊन ओबीसीसंदर्भात जागर करण्यात येणार आहे.

या यात्रेत कार्यकर्ते व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज भुजबळ, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, ओबीसी मोर्चा महिला जिल्हा संयोजक सीता पाटील, पनवेल शहर अध्यक्ष रामनाथ पाटील, तालुका अध्यक्ष विनेश भागीत, शहर महिला संयोजिका वृषाली वाघमारे यांनी केले आहे.

# पहिली ते पाचवी शाळा सुरू करण्यास टास्क फोर्सचा विरोध

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शहरी भागात आठवी ते बारावी आणि ग्रामीण भागात पाचवी ते बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत. त्यानंतर आता राज्यात पहिलीपासूनच्या शाळा सुरू होणार अशी शक्यता व्यक्त केली जात होती. यासाठी शालेय शिक्षण विभागही अनुकूल असल्याची माहिती समोर आली होती, मात्र कोरोना टास्क फोर्स यासाठी सध्या तयार नाहीए. टास्क फोर्सचे प्रमुख डॉ. संजय ओक यांनी याबद्दलचा खुलासा केला आहे.

मुले जवळपास १८ महिने शाळा बाहेर आहेत आणि याच्या दुष्परिणामांची मला पूर्ण कल्पना आहे, मात्र लहान मुले



कोविडला बळी पडणार नाहीत याची काळजी टास्क फोर्सला आहे. म्हणूनच पीडियाट्रिक व्हॅक्सिनेशन सुरू व्हावे यासाठी सोमवारच्या बैठकीत टास्क फोर्स राज्य सरकारला विनंती करणार आहे. जोपर्यंत विद्यार्थ्यांचे लसीकरण होत नाही तोपर्यंत शाळा सुरू करणे योग्य ठरणार नाही, असे डॉ. संजय ओक म्हणाले.

मास्क ही पहिली लस आहे, पण सणात लोकांनी मास्क टाळला, यामुळेच तिसरी लाट येणारच नाही असे म्हणता येणार नाही.

अमेरिकेत मुलांचे बाधित होण्याचे प्रमाण इतके वाढले की मुलांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात शिफ्ट केले जात आहे. ही परिस्थिती मला माझ्या राज्यात येऊ द्यायची नाही. तिसऱ्या लाटेचा अंदाज चुकल्याचा आनंद मला आहे, मात्र तिसरी लाट येणारच नाही असे म्हणता येणार नाही, असेही डॉ. ओक यांनी सांगून सध्या तरी पहिलीपासूनचे वर्ग सुरू करण्यास अप्रत्यक्षपणे विरोध दर्शविला आहे.



## ओबीसी जागर अभियानाचा उरणमध्ये शुभारंभ; रथयात्रेचे स्वागत

**उरण : वार्ताहर**

ओबीसी जागर अभियानाचा उरण शहरात आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. २०) भाजप कार्यालय येथे शुभारंभ करण्यात आला. या अभियानांतर्गत काढण्यात आलेल्या रथयात्रेचे आमदार महेश बालदी यांनी स्वागत केले.

या वेळी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, उरण पूर्व विभागीय अध्यक्ष शशी पाटील, शहर सरचिटणीस मनोहर शहानिया, शहर उपाध्यक्ष देवेंद्र घरत, अल्पसंख्यांक रायगड जिल्हा अध्यक्ष जसिम गॅस, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, मच्छींद्र पाटील, प्रकाश ठाकूर, मुकुंद गावंड, मनोहर सहतीया, माजी नगरसेवक राजेश कोळी, नरेश गावंड, शहर संघटक उपाध्यक्ष अजित भिंडे, यशवंत चौकेकर, श्री मनसुख आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

ओबीसी जागर अभियान या पत्रकात भाजप व मोदी सरकारने घेतलेले ओबीसीं साठीचे ऐतिहासिक निर्णय व भाजपा व फडणवीस सरकारने घेतलेले ओबीसीं साठीचे ऐतिहासिक निर्णय हे नमूद करण्यात आले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळात ३५ टक्के पेक्षा अधिक म्हणजेच २७ ओबीसी खासदारांना स्थान दिले आहे. मोदी सरकारने मेडिकलच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमातल्या ऑल इंडिया कोट्यातील जागांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांसाठी साठी २७ टक्के लागू केले. तसेच या सरकारद्वारा ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची योजना लागू करण्यात आली आहे. ओबीसी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबवत आहे. त्याचप्रमाणे भाजप व फडणवीस सरकारने घेतलेले ओबीसींसाठीचे ऐतिहासिक निर्णय घेतलेले आहेत. फडणवीस सरकारने पहिल्यांदा ओबीसींचे स्वतंत्र मंत्रालय स्थापन केले. या ओबीसी विभागाला फडणवीस सरकारने स्पेशल बजेट दिले होते. महाराष्ट्र राज्य ओबीसी वित्त व विकास महामंडळाची कर्ज मंजुरीची मर्यादा वाढविली होती. क्रिमिलिअर अट चार लाखांवरून आठ लाखांपर्यंत वाढवण्यात आली होती. ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांसाठी महाज्योती संस्था स्थापन करण्याचा निर्णय, ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय वसतिगृह निर्माण करण्याचा ऐतिहासिक निर्णय, ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणासंदर्भात खटला फक्त जिंकला नाही तर, ओबीसीसमाजाच्या हक्काचे ५० टक्क्यांवरील आरक्षणदेखील त्यावेळी वाचविण्यात आले होते. ५० टक्क्यांवरील ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी फडणवीस सरकारने ओबीसी कायद्याचा अध्यादेश काढला. या अद्यादेशात सुप्रीम कोर्टाने दिलेले ५० टक्क्यांवरील आरक्षणदेखील शाबूत राहिले आणि त्यावेळच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ५७ टक्के आरक्षणासोबत पार पडल्या.

भाजप ओबीसी मोर्चा यांच्यावतीने १० मार्च रोजी ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द झाल्याच्या निषेधार्थ विधानभवनावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. भाजप मोर्चाकडून ३ जून रोजी ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द झाल्याच्या निषेधार्थ नाकर्त्या सरकारविरोधात राज्यव्यापी आक्रोश आंदोलन करण्यात आले होते. २६ जून रोजी रद्द झालेल्या ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या निर्णयानंतर राज्यव्यापी चक्का जाम आंदोलन करण्यात आले होते, अशा माहितीपत्रकातून ओबीसी जागर अभियानांतर्गत रथयात्रेद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.







**पनवेल : शैक्षणिक क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा शुक्रवारी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या सत्कार सोहळ्याला मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष तथा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील तसेच श्यामनाथ पुंडे व अन्य उपस्थित होते. या वेळी सुवर्णपदकविजेता पैलवान रूपेश पावशे याचाही सत्कार करण्यात आला.**

## राज्य सरकारची दडपशाही; एसटी कर्मचाऱ्यांना घेतले ताब्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यामध्ये एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरूच आहे. त्यामुळे राज्य सरकार दडपशाही करण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोप सातत्याने एसटी कर्मचारी, विविध संघटनेचे नेते करताना दिसून येत आहे. त्यातच खारघर टोलनाक्यावर प्रत्येक गाडीची तपासणी करून एसटी कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले गेले.



राज्यातील अनेक एसटी कर्मचारी मुंबईतील आंदोलनात हजेरी लावण्यासाठी मुंबई-पुणे महामार्गावरून जाताना दिसून येत आहेत, मात्र पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करून एसटी कर्मचाऱ्यांना मुंबईत जाऊ घ्यायचे नाही यासाठी मोठ्या प्रमाणात प्रतिरोध सुरू केला आहे.

खारघर टोलनाक्यावर प्रत्येक गाडीची तपासणी पोलिसांकडून केली जात होती. त्यामध्ये एसटी कर्मचारी असेल तर त्याला ताब्यात घेतले गेले. अशा प्रकारे जवळपास ६० ते ८० एसटी कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.

## जेएनपीटी परिसरातील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीटी बंदर परिसरात रस्त्यावर उभ्या करण्यात येणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलरमुळे मोठ्या वाहतूक कोंडी होत आहे. ही वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी न्हावाशेवा वाहतूक पोलिसांनी रस्त्यावर उभ्या करण्यात येणाऱ्या अवजड वाहनांवर कायदेशीर ऑनलाइन दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यामुळे बंदर परिसरातील रस्त्यांवर बेकायदेशीरपणे उभी असलेली वाहने हटविल्याने जेएनपीटी बंदर परिसरातील रस्त्यांनी



मोकळा श्वास घेतला आहे.

जेएनपीटी बंदरात आयात-निर्यातीसाठी मालवाहतूक करणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलर चालकांना पार्किंगची व्यवस्था नसल्याने ही वाहने रस्त्यावरच उभी केली जात आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी ही समस्या नित्याची झाली आहे, मात्र वाहतूक पोलिसांनी हे रस्ते मोकळे करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे बंदराकडे जाणाऱ्या वाहनांना मार्गक्रमण होण्यासाठी सोयीचे ठरत आहे. जेएनपीटीने सुरू केलेल्या पार्किंगचे दर सामान्य ट्रेलर वाहतूक चालकांना परवडणारे नसल्याने ते पर्यायी मार्ग आणि पैसे वाचविण्यासाठी रस्त्याच्या बाजूला वाहने पार्किंग करतात.

जेएनपीटी महामार्गाच्या दोन्ही बाजूला अधिक प्रमाणात वाहने उभी केल्यास वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. जेएनपीटी बंदरात जेएनपीटीसह जीटीआय, एनएसआयसीटी व भारत मुंबई कंटेनर टर्मिनल्स अशी चार बंदरे कार्यरत आहेत.



**पनवेल : भाजप ग्रामीण मंडल अंतर्गत भिंगारवाडी गाव अध्यक्षपदी अशोक लहाने यांची निवड करण्यात आली आहे. त्याबाबतचे नियुक्तीपत्र भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शनिवारी लहाने यांना प्रदान केले. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, युवा मोर्चाचे योगेश लहाने, अंकुश पाटील, नरेश लहाने उपस्थित होते.**

पान १ वरून

## ओबीसी जागर अभियान रथयात्रेचा रायगडात शुभारंभ

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंदर्भात इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी ठाकरे सरकार जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहे. सरकारने केवळ तात्पुरता अध्यादेश काढून ओबीसी समाजाची दिशाभूल केली आहे. न्यायालयात टिकेल आणि ज्याला संविधानात्मक संरक्षण असेल असे आरक्षण मिळवण्यासाठी ओबीसी समाजाने एकत्र येऊन सरकारला असे आरक्षण द्यायला भाग पाडावे लागणार आहे, कारण हे सरकार ओबीसी समाजाबाबत उदासीन आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे राज्य मागास आयोगाची या सरकारने दुर्दशा केली आहे. ओबीसी समाज हा आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी एकत्र येऊन संघर्ष करीत नाहीये. त्याचाच गैरफायदा हे सरकार घेत आहे. ओबीसी समजाला गृहीत धरले जात आहे. या वेळी जर ओबीसी समाज एकत्र आला नाही तर ओबीसींचे राजकीय अस्तित्व संपून जाईल आणि सामाजिक अस्तित्वदेखील धोक्यात येईल. त्यामुळे ओबीसी समाजाने एकत्र यावे यासाठी हे अभियान राबवले जात आहे.

ओबीसी जागर अभियानाचे उत्तर रायगडमधील उद्घाटन ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत कामोठे भाजप कार्यालय येथे शुक्रवारी (दि. १९) सायंकाळी करण्यात आले. या वेळी ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, महिला आघाडी अध्यक्ष नगरसेविका सीता पाटील, भाजप कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक विजय चिपळेकर, नगरसेविका कुसुम म्हात्रे, पुष्पा कुत्तरवडे, भटक्या विमुक्त आघाडी महिला जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, सामाजिक कार्यकर्ते आर. जी. म्हात्रे, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, मंडल सरचिटणीस शरद जगताप, आध्यत्मिक आघाडी संयोजक विनोद खेडकर, मनीषा वनगे, जयश्री आचार्य, मनीषा पाटील, वनिता पाटील या पदाधिकाऱ्यांसह अनेक भाजप ओबीसी कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्यातील सरकारच्या निष्क्रिय कारभारामुळे आज राजकीय आरक्षण गेले. उद्या शिक्षण आणि नोकरीचे आरक्षणही काढतील. या पार्श्वभूमीवर समाजात या संदर्भात जागर झाला पाहिजे आणि जोपर्यंत ओबीसीचे राजकीय आरक्षण पूर्ववत होणार नाही तोपर्यंत ही लढाई सुरूच राहील, अशी भूमिका या जागर यात्रेची आहे.

## चिंध्रणच्या सरपंच कमला देशेकर यांचा महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिंध्रण ग्रामपंचायत हद्दीतील महिलांना बचत गटाचा मार्ग दाखवत सरपंच कमला एकनाथ देशेकर यांनी येथील महिलांना प्रगतीचा मार्ग दिला.

जवळपास २४ बचतगट सुरू करून ग्रामपंचायत हद्दीत सरपंच कमला देशेकर यांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने होत असलेले महिला सबलीकरण कौतुकास्पद आहे. प्रत्येक बचत गटाला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून १५ हजाराचे आर्थिक साह्य केले आहे. महिलांसाठी शिवण क्लास सुरू करून रोजगार उपलब्ध करून देण्याचे मोलाचे काम त्यांनी केले.

पनवेल तालुक्यातील चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंच कमला एकनाथ देशेकर यांनी संपूर्ण गावात सुविधा पोहचवत आदर्श सरपंच म्हणून गाडगे महाराज पुरस्कार पटकाविला आहे. भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या पत्नी कमला देशेकर ह्या पतीच्या खांद्याला खांदा लावून काम करत गावकऱ्यापुढे सरपंच कसा असावा याचा आदर्श ठेवला आहे. शिक्षणावर



भर देत गावात आता तिसरी अंगणवाडी लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या अंगणवाडीतील चिमुकल्यांचे आरोग्य जपताना त्यांना फिल्टर केलेल्या पाण्याची व्यवस्था केली आहे.

**गावच्या विकासासाठी विविध उपक्रम**

गावातील रस्त्यांवर अतिक्रमण होवून गावातील रस्ते गायब होत आहेत. ही दूरदृष्टी ठेवून संपूर्ण चिंधण गावात रस्त्याचे रुंदीकरण करताना रस्तांचे काँक्रिट करण्यात आले आहे. संपूर्ण गावात गटारे काढण्यात आली असून त्यांचे काँक्रिटिकरण करण्यात आले आहे. गावासाठी शुद्ध पाणी प्रकल्प राबविण्यात आला असून दररोज ८००० लिटर मोफत पाणीपुरवठा करण्यात येतो. शेतकऱ्यांना शेतीचे पीक योग्य प्रकारे व आधुनिक पद्धतीने घेता यावे म्हणून बोअरवेल देत मोटारचेही वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे या गावातील शेतकरी शेतीला प्रथम प्राधान्य देत आहे.

चिंध्रण गावाला लागून गावकऱ्यांच्या जमिनीवर आयटी पार्क येत असून गावातील तरुणांना त्यात रोजगार मिळावा म्हणुन त्याप्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्वस्वी प्रयत्न असणार आहे. त्याच बरोबर गावाच्या एक किलोमीटरच्या अंतरावर तळोजा एमआयडीसी वसलेली असल्याने त्यात जास्तीत जास्त तरुणांना रोजगार कसा मिळेल. यासाठी त्यांचे विशेष प्रयत्न असणार आहेत.

सर्वच महिलांची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना आर्थिक मदत म्हणून १५ हजार रुपयांची ग्रामपंचायतीमधून तरतूद केली. त्यानंतर बँक ऑफ इंडियाकडून दोन लाख रुपये कर्ज मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. गावाच्या दोन किलोमीटर अंतरावर तळोजा औद्योगिक वसाहत असल्याने सुशिक्षित महिलांना कारखान्यात काम देण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. महिलांसाठी मोकळ्या जागेत व्यायाम शाळा सुरू करण्यात आली असून त्यासाठी त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध होत आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून व गावाला लागून येणाऱ्या औद्योगिक विभागाचा विचार करून गावात दोन पाण्याच्या टाक्या असताना तिसरी टाकी उभारण्याचे काम सुरू आहे. गावात लवकरच शाळेची नवीन इमारत उभी करण्याचा त्यांचा मानस आहे.

गावात १०० टक्के लसीकरण होण्यासाठी प्रत्येकाच्या घरी जाऊन किंवा आशा नर्सच्या मदतीने गावाचे प्रथम लसीकरण करण्याचा मान कमला देशेकर यांचा आहे. पंधरा दिवसांत घनकचरा प्रकल्प उभा करून त्यातून वीजनिर्मित करण्याचा देशेकर यांचा प्रयत्न असून त्यात आम्ही यशस्वी होवू, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

## उरण ते आळंदी पायी दिंडीला प्रारंभ

**उरण : प्रतिनिधी**

उरण येथील वारकरी इंचागिरी संप्रदाय मंडळाची दिंडी पालखी ज्ञानेश्वर माऊलीचा जय घोष करीत आळंदीला निघाली. आळंदी येथील २७ नोव्हेंबरला सुरू होणाऱ्या ज्ञानेश्वर माऊलीच्या समाधी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी उरण कोटनाका येथील राघोबा मंदिर येथून ४० वारकऱ्यांची पायी दिंडी व ज्ञानेश्वर माऊलीची पालखी घेऊन वारकरी निघाले आहेत.



उरण येथून निघालेल्या या पायी दिंडीत सुरुवातीला ४० वारकरी निघाले आहेत. त्यामध्ये उरण, पनवेल, खालापूर व कर्जत तालुक्यातील विविध गावांतील वारकरी सहभागी होऊन आळंदीला जाताना लोणावळा घाटमाथ्यावर १५० हुन अधिक वारकरी या पायी दिंडीत सहभागी होत असतात, अशी माहिती उरण येथील हभप बाबर महाराज, देवजी महाराज व मधुकर पाटील महाराज यांनी दिली.

### दुखवटा

## यादव ममताबादे

**उरण :** उरण नगर परिषदेचे कर्मचारी यादव हिराप्पा ममताबादे यांचे गुरुवारी (दि. १८) निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, दोन नातू, पत्नी असा परिवार आहे. उरणमधील पत्रकार विठ्ठल ममताबादे यांचे ते मोठे भाऊ होत. कै. यादव ममताबादे यांच्यावर बोरी येथील स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले.



# चोरीच्या घटनांमध्ये वाढ

## नवी मुंबईत १० महिन्यांत १२८२ घटना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत चोरीच्या घटनांत मोठी वाढ झाली असून उकल होण्याचे प्रमाणही कमी आहे. विशेष म्हणजे या घटनांत सराईत चोरट्यांचा समावेश असल्याचे प्राथमिक संशय असून यात कोरोनाकाळात कारागृहातून सोडलेल्या आरोपींवर पोलिसांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे.

गेल्या दहा महिन्यांत नवी मुंबईत चोरीच्याच फक्त एक हजार २८२ घटना घडल्या आहेत. म्हणजे महिन्याला सरासरी १३० चोरीच्या घटना घडत आहेत. या चोरट्यांना रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी काळात नवी मुंबईत सर्वच प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसला होता, मात्र शिथिलीकरणानंतर हळूहळू चोरीच्या घटनांत वाढ होऊ लागली आहे. जनजीवन पूर्वपदावर आल्यानंतर चोरट्यांनी रेखी सुरू केली असून दिवसा व रात्रीही शहरात चोरीच्या घटना घडत आहेत.

२०२० मध्ये गेल्या वर्षी टाळेबंदी असताना ११००च्या आसपास चोरीच्या घटना घडल्या. त्यात निम्म्याहून अधिक रात्र घरफोडी झाल्या होत्या. जानेवारी ते ऑक्टोबर या पहिल्या दहा महिन्यांत ९२७ चोरीच्या घटना घडल्या होत्या. यात दोनशेपर्यंत दिवसा घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. यात २०१२ मध्ये मोठी वाढ झाली आहे. गेल्या दहा महिन्यांत एक हजार २८२ चोरीच्या घटना घडल्या आहेत. ज्यात तीनशेच्या घरात रात्रीच्या चोरीच्या घटना आहेत. त्यामुळे ही वाढ चिंताजनक आहे. शिवाय गुन्हे उकल प्रमाणही गेल्या वर्षीच्या तुलनेत खूप कमी आहे. गेल्या वर्षी ४३० गुन्हे उकल झाले होते. यावर्षी पहिल्या दहा महिन्यांत ४२७ गुन्हे उकल करण्यात यश आले आहे.

**सराईतांचा हात अधिक?**

***आतापर्यंत चोरीच्या उकल गुन्हात एक बाब समोर आली असून यात बहुतांश चोरटे हे कोरोनाकाळात कारागृहातून बाहेर आले असून ते पुन्हा चोरीच्या घटनांकडे वळले आहेत. त्यामुळे ते सराईत असल्याने पुरावे मागे ठेवत नसल्याने पोलिसांना अशा घटनांचा तपास करणे आव्हान ठरत आहे.***

**चोरीच्या घटनांत होणारी वाढ चिंताजनक असली तरी नागरिकांच्या सहकार्याने ती रोखली जाऊ शकते. त्या अनुषधाने पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. आगामी काळात या चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यात निश्चित आवश्यक आहे.पोलिसांना यश येईल. नागरिकांनीही सतर्क राहणे.**
**–सुरेश मेंगडे, उपायुक्त, गुन्हे शाखा**





# पनवेलमध्ये नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना चाप बसावा यासाठी पनवेल शहरात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

वाहतुकीचे नियम मोडल्यामुळे वाढते अपघातांचे प्रमाण व त्यामुळे होणार जीवितहानी रोखण्यासाठी वाहनचालकांना शिस्त लावणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई वाहतूक विभागाचे उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या सूचनेनुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील शिवशंभो नाका व नवीन पनवेल सिग्नल याठिकाणी मागील पाच दिवसांपासून सिग्नल जंपिंग ड्राइव्ह सुरू आहे.

पनवेल शहर हे आजूबाजूच्या गावांची मुख्य बाजरपेठ व मध्यवर्ती कार्यालयांचे ठिकाण असल्याने याठिकाणी दररोज परिसरातील नागरिक खरेदीसाठी व इतर कार्यालयीन कामकाजासाठी येत असतात. त्याचबरोबर पुणे, गोवा महामार्ग, उरण, कर्जत, खोपोली आदी ठिकाणी जाण्यासाठी अनेक मार्ग गेलेले असल्याने शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची कायमच वर्दळ असते. शहरातील गार्डन हॉटेल, नवीन पनवेल मार्ग, एचडीएफसी सर्कल, शिवशंभो नाका याठिकाणी सिग्नल असून वाहतूक नियमन करण्यासाठी वाहतूक पोलीस नेमलेले आहेत. तरीही काही बेशिस्त वाहनचालकांकडून सर्रास सिग्नल मोडून वाहने पुढे नेली जातात. यात प्रामुख्याने दुचाकीस्वारांकडून सर्रास सिग्नल जॅम्पिंग केले जात असल्याचे निदर्शनास आले. वाहतूक पोलीस अशा वाहनधारकांवर सातत्याने कारवाई करतात. त्यानंतरही वाहनचालकांमध्ये सुधारणा होत नाही. उलट सिग्नलवर वाहन पुढे नेऊन जीव धोक्यात घालून प्रवास केला जात आहे.

मोबाइलवर बोलत, सिग्नल मोडणाऱ्या वाहनचालकांमुळे अनेक अपघाताचे प्रसंग घडलेले आहेत. यामुळे रस्ता ओलांडणाऱ्या अनेकांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू झालेला आहे. त्यातच चिंतेची बाब म्हणजे एनएमएमटी बस चालकांमध्येदेखील सिग्नल तोडण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत. त्याबरोबरीने रिक्षा चालकांकडूनही अनेकदा सिग्नल जंपिंगचे प्रकार घडतात. तसेच भरधाव वेगाने वाहने चालवणारे रोडरोमियो पनवेल शहरात अधिक पहायला मिळतात. त्यामुळे अशा वाहनचालकांवर वाहतूक विभागाने सातत्याने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

**आतापर्यंत १७२ जणांवर बडगा**


***पनवेल शहरात सिग्नल जंपिंग ड्राइव्ह सुरू असून आतापर्यंत एकूण साधारण १७२ कारवाया करण्यात आल्या आहेत. तर सिग्नल तोडणाऱ्या ११४ वाहनचालकांचे लायसन्स तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहेत. याचबरोबरीने स्टॉप लाईनच्या ७३ कारवाया करण्यात आल्या असून ३७ प्रस्ताव आरटीओकडे पाठवण्यात आले आहेत. या कारवायांमुळे वाहनचालकांनाही काही काळ वाहतुकीची शिस्त लागली असल्याने याबाबत नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.***

**सर्वांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. सिग्नल जंपिंग करू नये. काहीजण अतिशय धोकादायक पद्धतीने सिग्नल जम्पिंग करतात, त्यामुळे अनेकदा अपघाताचे प्रसंग घडले आहेत. अनेकजणांनी प्राणही गमावले आहेत. झेब्रा क्रॉसिंगवर वाहने उभी करू नयेत. झेब्रा क्रॉसिंग लाईनच्या मागे गाडी थांबवावी. पादचाऱ्यांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. सिग्नल जंपिंग करणाऱ्या वाहनचालकांचे लायसन्स तीन महिन्यांसाठी रद्द केले जाईल.**
**–संजय नाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक विभाग**

# पनवेल परिसरातही लूटमारीचे प्रमाण वाढले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील कामोठे, कळंबोली, खारघर आणि येथील परिसरातील गावागावांमध्ये लूटमारीसह चोरी, चेन स्नॅचिंग अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. तसेच या घटनांच्या उकली होण्याचे प्रमाण त्याप्रमाणात वाढत नसल्याचे दिसून येत आहे. नुकत्याच पनवेल परिसरात चोरीच्या तीन घटना घडल्या आहेत.




पहिल्या घटनेत पनवेल जवळील मुंबई ते गोवा मार्गावरील आगरी कट्टा हॉटेलमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून जवळपास १६ हजारांचे साहित्य चोरून नेल्याची घटना घडली आहे. अज्ञात चोरट्याने आगरी कट्टा हॉटेलच्या स्लायडिंग खिडकीच्या उघड्या दरवाज्यावाटे आत प्रवेश केला व त्याठिकाणी असलेले वेल्डिंग मशीन, ग्राईंडर मशीन, ड्रिल मशीन व वेल्डिंग केबल, असा मिळून जवळपास १६ हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेते एका ७० वर्षीय वृद्ध महिलेस फसवून तिच्याकडे असलेले जवळपास एक लाख ८० हजारांचे सोन्याचे दागिने दोन अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. ही घटना पनवेल शहरातील टपाल नाका येथील शनी मंदिराजवळ असलेल्या रिक्षा स्टँड तसेच बेथल प्रार्थनालयाजवळ घडली आहे. यमुना वास्कर (वय ७०, रा. कुंडेवहाळ) या चिखले येथे राहणाऱ्या त्यांच्या मुलीस भेटण्यासाठी जात असताना टपालनाका परिसरात दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्याजवळ येऊन तुम्हाला १७०० रूपये मिळवून देतो असे सांगितले. त्यासाठी तुमच्या अंगावर असलेले दागिने काढून पाकिटात ठेवून द्या व ते पाकिट तुमच्या पिशवीत ठेवा असे सांगितले. यानंतर दोघांपैकी एका व्यक्तीने त्यांना हजार रूपये दिले तसेच पाकीट असलेली पिशवी त्यांच्या हातात दिली व आम्ही लगेच येतो असे सांगून ते निघून गेले. काही वेळाने महिलेने पिशवी तपासली असता त्यात दागिने आढळून आले नाहीत. त्यामुळे आपली फसवणूक लक्षात येताच महिलेने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली.

तिसऱ्या घटनेत तीन लाख रुपये असलेली पिशवी घेऊन गाडीकडे पायी जात होते. या वेळी दोन अज्ञात व्यक्तींनी मोटरसायकलवरून पाठीमागून येऊन रोखरक्कम असलेली पिशवी पळवली. ही घटना शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र समोरील भाजी मार्केट परिसरात घडली आहे. गोपीचंद ठाकूर (वय ५४) हे त्यांच्या मित्रासोबत फोनवर बोलत त्यांनी उभी करून ठेवलेल्या गाडीकडे रोखरक्कम घेऊन पायी जात होते. या वेळी दोन अज्ञात व्यक्तींनी मोटरसायकलवरून पाठीमागून येऊन रोखरक्कम असलेली पिशवी पळवून नेली. त्यामुळे ठाकूर यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

## निवडक

### वाशिवली येथून एक जण बेपत्ता



**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाशिवली येथून ३८ वर्षीय तीन महिने वयातील राधेशाम राजाराम सैनी हा व्यक्ती बेपत्ता झाल्याची तक्रार राजकुमार रामचंद्र कुशवाहा (वय ३२) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात दिली आहे. राधेशाम राजाराम सैनी (रा. तरया पो. तरया सुजान जि. कुशीनगर) हा कामाकरिता सब कॉन्ट्रक्टर राजकुमार कुशवाहा हा याला भेटण्याकरीता पार्ले अग्रो. प्रा. लि.कंपनी (वाणिवली–वाशिवली) येथे आला असता त्यांची भेट घडली नाही. तो कोणालाही काही न सांगता कोठेतरी निघून गेला आहे. राधेशामची उंची पाच फूट सहा इंच असून त्याने निळा शर्ट व काळी पॅन्ट घातली आहे. त्याच्या भुवईच्या मध्यभागी जुन्या जखमेचे वर्ण असून पायात सॅन्डल आहे. अशा वर्णनाची व्यक्ती आढळल्यास याबाबत रसायनी पोलीस ठाणे (०२१९२–२५०१३३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उसर्ली गावातून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** किरकोळ वादातून आई ओरडल्याने त्याचा राग मनात धरून एक तरूणी राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. प्रिती उर्फ दीदी अश्विन कांबळे (रा.–उसर्ली गाव) हीची उंची साधारण पाच फूट, डोक्याचे केस काळे वाढलेले, अंगाने मजबूत, चेहरा गोल, रंग गहुवर्ण, कपाळ मोठे असून तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. तिने अंगात सफेद टॉप व ग्रे लेगिन्स घातलेली आहे. तसेच पायात प्लॅस्टिकची गुलाबी चप्पल आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक एम.एम. झिने यांच्याशी संपर्क साधावा.

### पोलिसांनी विवाहितेला आणले परत

**पनवेल :** कौटुंबिक वादातून घर सोडून गेलेल्या एका विवाहित महिलेस पनवेल शहर पोलिसांनी नाशिक येथून परत आणले आहे. शहरातील लाईन आळी येथे राहणारी एक विवाहित महिला कौटुंबिक वादातून घरात कोणास काही एक न सांगता नाशिक येथे तिच्या मैत्रिणीच्या घरी गेली होती. या संदर्भात तिच्या पतीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात ती हरविल्याची तक्रार दाखल करताच पोलिसांनी या संदर्भात सखोल तपास सुरू केला. वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात तसेच रेल्वे स्थानकात व रेल्वे पोलीस यांना या संदर्भात महिलेची माहिती दिली. इतर तांत्रिक तपास व मोबाइल फोन तसेच सोशल मिडीया व नातेवाइकांशी संपर्क साधून अधिक तपास केला असता ही महिला नाशिक येथे तिच्या मैत्रिणीकडे असल्याचे समजले. त्याअनुषंगाने तिच्याशी संपर्क साधून तिला सुखरुपपणे परत घरी आणण्यात आले आहे.



**कामोठे : सेक्टर १२ येथे शुगरफ्रॉस्ट बेकींग कंपनी हे केक शॉप नव्याने सुरू झाले आहे. या शॉपचे उद्घाटन सोशल मीडिया सेलिब्रिटी आणि चिकन लेग पीस फेम उल्हास कामथे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, महिला मोर्चाच्या आशा भगत, प्रजिती म्हात्रे, दीपिका कडू, जितेंद्र कडू आदी उपस्थित होते.**

# नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या पुढाकाराने कामोठ्यातील समस्या दूर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या पाठपुराव्यामुळे कामोठे येथील शुभम सोसायटी परिसरात असणाऱ्या समस्या सोडविण्यात आले आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी चिपळेकर यांचे आभार मानले आहेत.

कामोठ्यातील शुभम सोसायटी प्लॉट न.५३ सेक्टर ६– येथील रहिवासी सोसायटी समोरील रस्त्यावरील खड्डे आणि सिडकोकडून होत असलेला अपुरा पाणीपुरवठा या समस्यांनी गेल्या काही दिवसांपासून त्रस्त झाले होते. सोसायटीचे अध्यक्ष आनंद मोरे, सेक्रेटरी संदीप पवार, सदस्या स्वरा परब यांनी नगरसेवक विजय चिपळेकर यांची भेट घेऊन सोसायटीच्या समस्या दूर करण्याची मागणी केली. नगरसेवक चिपळेकर यांनी रहिवाशांना होणारा त्रास लक्षात घेऊन या मागणीची तत्काळ दखल घेत सिडकोकडे या समस्येचा पाठपुरावा केला. त्यानुसार चिपळेकर यांच्या पाठपुराव्यामुळे सिडकोच्या माध्यमातून शुभम सोसायटी समोरील रस्त्यावरील खड्ड्यांचे डांबरीकरण कार्य पूर्ण करण्यात आले. तसेच सोसायटीला होणारा कमी पाणीपुरवठा याबाबत जोपर्यंत सिडकोकडून पुरेसा पाणीपुरवठा होत नाही तोपर्यंत दररोज दोन टँकर पाणीपुरवठा केला जाईल, अशी व्यवस्था केली.



दररोज होणाऱ्या त्रासापासून नगरसेवक चिपळेकर यांच्या पाठपुराव्यामुळे सुटका झाल्याची भावना शुभम सोसायटीच्या रहिवाशांनी व्यक्त केली.

# गव्हाण फाट्याजवळील कोंडी फुटणार

## तीन रस्ते जोडणारा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण फाटा येथील तीन वेगवेगळ्या रस्त्यांना जोडणारा हाफ क्लोअरलिफ्ट इंटरटेन प्रकारचा उड्डाणपूल शुक्रवारी (दि. १९) वापरासाठी खुला करण्यात आला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या पूलाचे लोकार्पण करण्यात आले. आमदार महेश बालदी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून हा उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या रस्त्यामुळे गव्हाण फाट्याजवळील कोंडी सुटणार आहेच, याशिवाय उरण फाट्याहून विनाअडथळा पुणे आणि गोवा महामार्ग गाठता येणार आहे.

नवी मुंबईच्या विमानतळावर विमानांचे उड्डाण होऊ लागल्यानंतर या भागात दररोज एक लाख वाहनांची वर्दळ असेल, असा अंदाज बांधण्यात आला आहे. त्यामुळे जेएनपीटी, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण आणि सिडको या तीन प्राधिकरणांनी एकत्रितपणे दोन हजार ९३६ कोटी रुपये खर्च करून विमानतळाच्या चारही सीमाभागातील रस्ते विकसित करण्याचे काम २०१४ पासून सुरू आहे. पॅकेज वन आणि पॅकेज टू अशा दोन टप्प्यांत ४४ किलोमीटर रस्त्याचे जाळे मजबूत करण्यात आले. अशोका बिल्डकॉन, जेकुमार आणि पनवेलच्या जेएमएमआयपीएल कंपनीला या कामांचे एकत्रित कंत्राट देण्यात आले होते. या कामातील महत्त्वाचा समजला जाणाऱ्या गव्हाण फाटा येथील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले असून तो शुक्रवारी वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला.

**नवी मुंबईतून थेट पुणे आणि गोवा महामार्ग गाठण्यास फायदेशीर**

नवी मुंबईतून सायन–पनवेल महामार्गावरून उरण फाट्यावरून किल्ले जंक्शन येथून सुरू होणारा हा रस्ता गव्हाण फाटा येथे तीन वेगवेगळ्या मार्गिकांवर जाऊन संपतो. किल्ले जंक्शन येथून गव्हाण फाट्यापर्यंत उड्डाणपूल असून जेएनपीटी, पनवेल आणि उरणच्या दिशेने या रस्त्याने जाता येणार आहे. उरणकडून जुन्या मार्गाने आल्यास पनवेलकडे जाण्याच्या मार्गाला लागता येते. नवी मुंबईत थेट पामबीच मार्गावरही या रस्त्याने जाता येते. एवढेच नव्हे तर जेएनपीटी महामार्ग जुन्या मुंबई–पुणे महामार्गावर संपत असल्यामुळे थेट पुण्याला जाणारी वाहने, पळस्पे फाट्यावरून मुंबई गोवा महामार्गाने कोकणात जाणाऱ्या वाहनांना हा नवा उड्डाणपूल सोयीचा ठरणार आहे. पॅकेज २ मधील हे महत्त्वाचे काम संपल्यामुळे जेएनपीटी बंदरामुळे आणि भविष्यात विमानतळामुळे रस्त्यावर येणारी अवजड वाहनांची कोंडी उड्डाणपुलामुळे सुटणार आहे. मुख्यत्वे हा पूल अवजड वाहनांच्या सोयीसाठी बांधण्यात आल्याचे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता प्रशांत फेगडे यांचे म्हणणे आहे.

२०१४ मध्ये सुरू झालेल्या या कामातील ४४ किलोमीटरच्या एकूण प्रकल्पातील आता चिरनेर फाट्यासमोरील एका उड्डाणपुलाच्या कामाचा शेवटचा टप्पा शिल्लक आहे. हे काम पूर्ण झाल्यास दोन हजार ९३६ कोटी रुपयांच्या एनएचएआय, सिडको आणि जेएनपीटी यांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या प्रकल्पाचे काम पूर्ण होणार आहे.

## धूर व औषध फवारणी





**पनवेल : नगरसेविका दर्शना भोईर यांच्या प्रयत्नातून प्रभाग क्रमांक १९मधील संपूर्ण मिडलक्लास सोसायटी, मार्केट यार्ड परिसर येथे विशेष ई–रिक्षामार्फत धूर फवारणी व औषध फवारणी करण्यात आली.**

अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

**सरकारी आणि खाजगी भागीदारीतून देशासमोरील समस्या सोडविणे, हे आधुनिक तंत्रज्ञानामुळे शक्य होताना दिसते आहे. गेल्या १८ नोव्हेंबरला झालेल्या 'गुगल फॉर इंडिया'च्या सातव्या वार्षिक परिषदेनेही भागीदारी किती व्यापक असू शकते, याची प्रचिती दिली. गुगलसारख्या कंपन्या या मार्गाने भारतातील आपला व्यवसाय वाढविणार आहेत हे तर उघडच आहे, पण हा प्रवाह आता टाळता न येणारा असल्याने त्याचा थेट फायदा घेणे तसेच गुंतवणुकीचे नवे मार्ग वापरून त्याचे भागीदार होणे हे तर आपण केलेच पाहिजे.**

# सर्वव्यापी बदलांचा गुगल इरादा




आज देशासमोर जे प्रश्न किंवा समस्या आहेत ते सोडविण्याची जबाबदारी कोणाची आहे याचे लोकप्रिय उत्तर 'सरकार' असे आहे, मात्र एकटे सरकार सर्व प्रश्न सोडवू शकत नाही हे सर्वांनाच माहीत असते. प्रश्न सोडविण्यासाठी जे नागरिक, खाजगी उद्योग आणि सामाजिक संस्था पुढे येतात त्यांना योग्य वातावरण निर्माण करणे हे काम सरकारचे असते. याचा अर्थ प्रश्न किंवा समस्या सोडविण्याचा प्रयत्न समाज नेहमीच करत असतो आणि त्यात सर्व घटक आपापल्या परीने सहभागी होत असतात. अलीकडेविकसितझालेल्या तंत्रज्ञानामुळे खाजगी कंपन्यांचा त्यातील वाटा वाढत चालला आहे. या कंपन्या एकीकडे आपला व्यवसाय करत असतात, तर दुसरीकडे आपली प्रतिमा जपण्याचा प्रयत्न करत असतात. समस्या सोडविण्याचे हे सरकारी आणि खाजगी प्रयत्न किती बेमालूमपणे मिसळले आहेत, याची प्रचिती १८ नोव्हेंबरला झालेल्या 'गुगल फॉर इंडिया'च्या आभासी अशा सातव्या वार्षिक परिषदेच्या निमित्ताने आली.

## भारतीय बाजारपेठेचे महत्त्व

गुगलसारख्या जागतिक पातळीवरील कंपन्यांच्या दृष्टीने भारतीय बाजारपेठ किती महत्त्वाची आहे हे 'गुगल फॉर इंडिया' परिषदेच्या निमित्ताने पुन्हा समोर आले. भारतात वाढत चाललेला इंटरनेटचा वापर, एकूणच भारताची प्रचंड लोकसंख्या आणि त्यात तरुणांचे असलेले अधिक प्रमाण, स्मार्ट फोनचा वाढत चाललेला वापर आणि भारतीय बुद्धीमत्तेच्या आधारे काही जटील प्रश्नावर सापडणारी उत्तरे... (त्याला काहीजण जुगाड म्हणतात.) हे गुगल कंपनीला आकर्षित करते आहे. त्यामुळेच गुगलने भारतात पक्के पाय रोवले आहेत. भारतात नजीकच्या भविष्यकाळात गुगल काय काय करू इच्छिते, याची झलक या परिषदेत पाहायला मिळाली. खाजगी कंपन्या करत असलेल्या कामांचे तुम्ही समर्थक असो की विरोधक असो, तुम्ही या बदलांकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत, इतके हे बदल सर्वव्यापी असणार आहेत.




## गुगलच्या मदतीची अपरिहार्यता

ही परिषद झाली त्याच्या दुसऱ्या दिवशी पुण्यातील एक बातमी अशी होती की, पुण्यातील पीएमटी बस सेवा वापरणे प्रवाशांना सुलभ व्हावे म्हणून महापालिकेने एक ॲप तयार केले होते, पण हा विषय पुढे गेला नाही. या ॲपचा वापर आज तरी होताना दिसत नाही, पण हा प्रयत्न आपल्याला सोडायचा असेल तर गुगलसारख्या कंपनीची मदत घेतली पाहिजे, असे काही जणांना वाटले आणि आता गुगल हे ॲप तयार करण्यासाठी महापालिकेला मदत करणार आहे. याचा साधा अर्थ असा की पुण्यासारख्या महापालिकेतील सिटी बसचा प्रश्न गुगलच्या मदतीने सोडविण्याचा प्रयत्न होणार आहे. अर्थात, याचा अर्थ पुणे महापालिका कमी पडते आहे, असा घेता कामा नये. याचा अर्थ एवढाच आहे की, गुगलने इंटरनेटच्या माध्यमातून असे काही जाळे विणले आहे की, त्याचा वापर करून तुम्ही स्थानिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करू शकता. ओला, उबरचा प्रवास किंवा पत्ता सोधण्यासाठी अलीकडे सर्रास वापरले जाणारे गुगल मॅप हे त्याचे चपखल उदाहरण म्हणता येईल. अशा अनेक प्रश्नांना गुगल हात लावणार आहे, हे या परिषदेत लक्षात आले.

## भागीदार तर होऊयात!

तंत्रज्ञानाचा मानवी जीवनातील अतिरिक्त हस्तक्षेप आणि सोशल मिडियाचे समाजावर होत असलेले परिणाम हा सध्या जगभर चर्चेचा विषय आहे. त्यामुळे एक खाजगी कंपनी एवढे सर्व का करते आहे, म्हणून त्या विषयी शंका घेण्याचा आपल्याला निश्चितच अधिकार आहे, पण वर उल्लेख केलेले प्रश्न आपण कसे सोडविणार आहोत याची उत्तरे आपल्याकडे नसतील, तर नागरिक अशा खाजगी कंपन्यांच्या सेवांचा वापर करणार हे ओघाने आलेच. तंत्रज्ञानामुळे यातील काही प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा होणार असेल तर त्याला दोष देण्यापेक्षा त्यात भाग घेणे एवढे आपल्या हातात आहे. गुगलसारख्या कंपन्या या मार्गाने आपला व्यवसाय वाढविणार आहेत, हे तर उघडच आहे. त्यामुळे त्यातही आपण गुंतवणुकीचे नवे मार्ग वापरून भागीदार झाले पाहिजे.

## परिषदेत झालेल्या घोषणा

'गुगल फॉर इंडिया' या परिषदेत अशा कोणत्या योजनांची घोषणा झाली याची यादी मोठी आहे, पण त्यातील काही निवडक घोषणा काय आहेत ते आपण पाहू. १. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या जगाला भेडसावते आहे. भारताला त्याचा मोठाफटका अतिवृष्टीच्या रूपाने यावर्षी बसला आहे. गुगल सरकारच्या हवामान खात्याच्या मदतीने हवामानावर अधिक बारकाईने लक्ष ठेवून त्याच्या सूचना नागरिकांना मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे. गुगलने त्याची सुरुवात यावर्षी केली असून पूर आणि अतिवृष्टीचा सामना करणाऱ्या दोन कोटी नागरिकांना ११ कोटी मेसेज पाठविले आहेत. २. उत्तर भारतात प्रदुषणामुळे जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे, अशा भागात गुगलने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मदतीने हवेच्या दर्जाविषयी मेसेज पाठविण्यास सुरुवात केली आहे. ३. इंटरनेट प्रसार वेगाने होणार आणि त्यात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होणार आहेत. इंटरनेटच्या वापरासंबंधी कौशल्ये असल्याशिवाय या संधी भारतीय तरुणांना घेता येणार नाहीत. त्यामुळे या क्षेत्रात कौशल्ये विकासाचे काम गुगल करणार आहे. आयटी मॅनेजमेंट, डाटा अनॅलिटिक्स, युएक्स डिझाईन असे कोर्सेसच गुगल सुरू करते आहे. सहा ते आठ हजार रुपये असे शुल्क या कोर्सेसचे असून गुगल करीअर सर्टिफिकेट्स मिळविणाऱ्या एक लाख तरुणांना शिष्यवृत्ती देण्याची तयारी गुगलने केली आहे. ४. कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षण ही गरज आपल्याला मान्य करावी लागली असून ही पद्धत आता कोणत्या ना कोणत्या रूपाने सुरूच राहणार आहे. गुगल क्लासरूम प्रोग्रामच्या मार्गाने इंटरनेटवर अभ्यासक्रम उपलब्ध केले जाणार आहेत. जो इंटरनेट स्पीड चांगली असताना डाऊनलोड करता येईल आणि कधीही वापरता येईल. ५. सध्या गुगलवरील सर्च फक्त इंग्रजी भाषेत मिळतात, पण आता सुरुवातीला हिंदी आणि नंतर इतर सर्व भारतीय भाषांमध्ये हे सर्च उपलब्ध होतील. शिवाय त्यासाठी कोणतेही शब्द टाईप करण्याची गरज नाही. तो शब्द गुगल असिस्टंट ओपन करून उच्चारला की त्या विशिष्ट भाषेतील माहिती समोर येईल. एवढेच नव्हे तर ती गुगल वाचवूनही दाखवेल. ज्यांना इंग्रजीत शिक्षण घेतलेले नाही, त्यातील अनेक जण इंग्रजी वापरताना अडखळतात त्यांची यामुळे गैरसोय दूर होईल. पुढील वर्षभरात यात मोठी सुधारणा अपेक्षित आहे. ६. गुगल पे चा वापर किती वेगाने वाढतो आहे, हे आपण पाहत आहोत. गेल्या वर्षी त्यावर १५ अब्ज व्यवहार झाले. आता बिल स्प्लीट करण्याची तसेच त्यावर इंग्रजीसोबत 'हिंग्लीस' (हिंदी आणि इंग्रजी एकत्रित) भाषा वापरण्याची सोय होणार आहे. ७. गुगल पे वर माय शॉप हे फिचर येणार असून त्यावर त्या विक्रेत्याकडे असलेल्या सर्व वस्तूंची यादी पाहायला मिळणार आहे. ८. कोरोनाविरोधी लस सर्वांनी घेतली पाहिजे, याविषयी आता काही दुमत राहिलेले नाही, पण ज्यांच्याकडे संगणक नाही त्यांची अडचण होऊ नये म्हणून ते स्मार्ट फोनच्या मदतीने आणि आपल्या भाषेत गुगल असिस्टंटला सांगून बुकिंग करू शकतील. ९. मित्र नावाच्या एका कार्यक्रमाच्या माध्यमातून गर्भधारणा झालेल्या महिलांना मदत केली जाणार आहे. ज्यांना तातडीची वैद्यकीय गरज आहे त्यांना ती मिळावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी गुगल आर्टिफिशियल इंटलिजियन्सचा आधार घेणार आहे. यासाठी अरमान या स्वयंसेवी संस्थेला गुगलने सोबत घेतले आहे. १०. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या जिओशी करार करून गुगलने भारतीय गरजा लक्षात घेऊन स्वस्तातील स्मार्ट फोन उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे. तो फोन पाच हजार रुपयांच्या आसपास मिळणार आहे. त्यामुळे ज्यांना स्मार्ट फोनच्या किमती परवडत नाहीत त्यांनाही स्मार्ट फोन वापरणे शक्य होणार आहे.

---

# घर घ्यायचे कधी आणि भाड्याने कधी राहायचे?



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

**घरामध्ये गुंतवणूक करणं हा एक अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे, कारण त्यासाठी आवश्यक असलेली रक्कम एखाद्याच्या आयुष्यातील संपूर्ण बचत संपवून टाकते. त्यामुळे घर घेण्याच्या तर्कशुद्धतेबद्दल वाद घालण्यापेक्षा घर घ्यायचं असल्यास कधी घ्यावं आणि भाड्याच्या घरात राहायचं झाल्यास कोणत्या परिस्थतीत यावर विचार करावा, म्हणजे 'घरामधील गुंतवणूक कधी' याचे आपोआपच उत्तर मिळेल.**



मागील लेखात आपण, अनावश्यक खरेदीविषयीचा 'डिडरोट इफेक्ट' जाणून घेतला या वेळेस आपण अनेकांच्या अत्यंत लाडक्या अशा गुंतवणूक विषयावर चर्चा करू. 'मूर्ख लोक घरं बांधतात आणि शहाणे लोक त्यात राहतात'. ही ब्रिटीश म्हण अनेकदा घर खरेदीच्या विरोधात युक्तिवादात वापरली जाते. याचा गर्भितार्थ सांगण्यास प्रसिद्ध गुंतवणूक गुरु वॉरन बफे यांचं एक वाक्य इथं नमूद करावं वाटतं - "If you buy things you do not need, soon you will have to sell things you need." तुम्ही तुम्हाला गरज नसलेल्या गोष्टी विकत घेतल्यास, लवकरच तुम्हाला तुमच्या गरजेच्या वस्तू विकाव्या लागतील.

बहुतेक लोकांसाठी, गुंतवणूक म्हणून रिअल इस्टेट खरेदी करण्यामागील मुख्य कारण म्हणजे नफा मिळवणं. तथापि, अनेक अशी उदाहरणं असू शकतात जेव्हा तुम्ही सर्व घटकांचा विचार न करता आणि संपूर्ण गणित मांडल्याशिवाय मालमत्ता खरेदी करू पाहता आणि जेव्हा अशा प्रकारे घाईगडबडीत असे मोठे निर्णय घेतले जातात तेव्हा तुम्हाला हवे असलेले परतावे मिळू शकत नाहीत किंवा त्याहून वाईट म्हणजे त्यात तोटाच होऊ शकतो. १५ ते २० वर्षांपूर्वीची रिअल इस्टेटची परिस्थिती वेगळी होती जेव्हा भाव वर्ष–दोन वर्षांत दुप्पट झालेले असायचे, परंतु जोरदार पुरवठ्यामुळं रिअल्टी मार्केट सध्या सर्वोत्तम राहिलेले नाही.

घरामध्ये गुंतवणूक करणं हा एक अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे, कारण त्यासाठी आवश्यक असलेली रक्कम एखाद्याच्या आयुष्यातील संपूर्ण बचत संपवून टाकते. माझ्या मते, घर घेण्याच्या तर्कशुद्धतेबद्दल वाद घालण्यापेक्षा घर घ्यायचं असल्यास कधी घ्यावं आणि भाड्याच्या घरात राहायचं झाल्यास कोणत्या परिस्थतीत, यावर चर्चा करू म्हणजे 'घरामधील गुंतवणूक' यावर आपोआपच उत्तर मिळेल.

आज कोणत्याही मेट्रोसिटीमध्ये घर घ्यायचं झाल्यास अगदी वन बीएचके सदनिका सर्वसाधारणपणे ३५ लाख ते ५० लाखांच्या घरात जाते तर टू बीएचके एक कोटी आणि प्रीमियम अपार्टमेंट दोन ते तीन कोटींच्या घरात (मुंबई सोडून). अर्थात यामध्ये खूप तफावत आहे. आजुबाजूचा भाग, वस्ती, जवळील हॉस्पिटल, बाजारपेठ, प्रवासी अड्डे (रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड व एअरपोर्ट) यांचा थेट परिणाम घराच्या भावांवर होतो. मुंबईमध्ये, दक्षिण मुंबई (मलबार हिल, कफ परेड, नेपियन सी रोड, ताडदेव इत्यादी) जरी एअरपोर्टपासून दूर असेल तरी तिथं राहणाऱ्या उच्चभ्रू वर्गामुळं तिथल्या इमारतींप्रमाणं त्यामधील घरांचे भाव नेहमीच गगनाला भिडलेले असतात. त्याखालोखाल जुहू, वांद्रे व वरळी हे भाग येतात, जिथं प्रति चौरस फूट सुमारे ४५ हजार ते ५० हजार भाव आहे. पुण्याचीदेखील हीच गत. कोरेगाव पार्क, प्रभात रोड, मॉडेल कॉलनी, कल्याणी नगर या भागातील घरांच्या किमती अशाच प्रीमियम असतात. अगदी उपनगरांमध्येदेखील घर घ्यायचं झाल्यास ॲमेनिटीजच्या नावाखाली भावदेखील चढेच लावले जातात. त्यामुळं कमीतकमी घरखरेदीची रक्कम ही ५० लाखांच्या घरात जातेच आणि त्यावर मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, पार्किंग, मेंटेनन्स, वीज कनेक्शन व इतर खर्च धरून जास्तीचे १० ते १२ टक्के वाढतात. आता, बँका, सामान्यतः, नवीन मालमत्तेच्या किमतीच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम गृहकर्ज म्हणून देत नाहीत, तर खरेदीदाराला मार्जिन मनीच्या उर्वरित ३० टक्के रक्कम स्वतःच्या निधीतून उभारावी लागते. वर पाहिलेल्या उदाहरणांमध्ये जोपर्यंत तुम्ही मार्जिन मनी पुरविण्यासाठी पुरेशी बचत करू शकत नाही तोपर्यंत तुम्हाला भाड्याच्या घरात राहण्याशिवाय पर्याय नसतो. जर तुम्ही एखाद्या कंपनीमध्ये कर्मचारी असाल आणि तुमची नियुक्ती एखाद्या ठिकाणी अल्प कालावधीसाठी झाली असेल किंवा तुम्ही अशा ठिकाणी काम करत असाल जिथे तुमचा स्थायिक होण्याचा मनसुबा नसेल, तर ज्या शहरात तुम्ही कामासाठी तात्पुरते वास्तव्यास असाल तिथं घर भाड्यानं घेणं अधिक चांगला पर्याय ठरू शकतो.

याउलट समजा तुम्ही नवीन शहरात स्थायिक व्हायचा विचार केल्यास तुमच्या कुटुंबाचा आकार तुमच्या निर्णयावर परिणाम करू शकतो. जर तुम्ही तुमचं कुटुंब वाढवण्याचा विचार करत असाल तर पुढं जाऊन तुम्हाला मोठ्या घराची आवश्यकता भासू शकते. त्यामुळं त्यासाठी आधीच तुम्हाला त्या प्रकारे योजना करावी लागेल. त्यातून तुमच्या जोडीदाराचंदेखील उत्पन्न गृहीत धरता येऊ शकतं. याउलट, एकदा तुमचं घर खरेदी करण्याचं निश्चित झाल्यास (यामध्ये घेत असलेल्या घरापासून तुमच्या कचेरीचं अंतर, प्रवास खर्च, प्रवासास लागणारा वेळ इत्यादी) लागणारा मार्जिन मनी, जो शक्यतो तुमच्या बचतीमधूनच असावा (ज्यासाठी दुसरं वैयक्तिक कर्ज घेण्याची गरज पडावयास नको) त्याची तयारी करणं अग्रगण्य ठरतं.

घर खरेदी करण्याचा निर्णय केवळ घर–भाडं आणि घरासाठी लागणारा निधी यातील खर्च–लाभ विश्लेषणावर आधारित आहे. भाडं हे साधारणपणे घराच्या भांडवली मूल्याच्या जास्तीत जास्त अर्ध्या टक्क्याच्या आतच असतं, तर गृहकर्जासाठी कर्ज हे साधारणपणे आठ टक्के दरानं मिळतं. समजा उदाहरणासाठी आपण एक कोटी रुपयांची घर खरेदी गृहीत धरल्यास त्याचं मार्जिन मनी सुमारे २० टक्के व वरील खर्च १० टक्के म्हणजे एकूण ३० लाख. हे तीस लाख तुमच्या बचतीतून असल्यानं त्यावरील व्याज अथवा परताव्यास यापुढं मुकावं लागेल. हा मार्जिन मनी सर्वसाधारणपणे शेअर्स, म्युच्युअल फंड्स, सोनं, मुदत ठेव अशातून उभा केला जातो म्हणजे तेथील परताव्यावर पाणी सोडावं लागतं जो दीर्घावधीसाठी साधारणपणे सरासरी १३ टक्क्यांच्या आसपास असू शकतो.




दुसरी गोष्ट म्हणजे कर्ज. कर्जाचे दर हे बँक तुमच्या कंपनीवर (एम्प्लॉयर), तुमच्या हातात पडणाऱ्या उत्पन्नावर ठरतात जे सुमारे सहा ते दहा टक्क्यांपर्यंत असू शकतात. सर्वसाधारणपणे हातात पडणाऱ्या उत्पन्नाच्या ४० ते ४५ टक्के रकमेचा ईएमआय येईल असंच कर्ज बँका तुम्हाला देण्यास खुश असतात. एका अग्रगण्य संस्थेच्या कर्जाचं उदाहरण घेतल्यास ८० लाख रकमेच्या घरकर्जासाठी द.सा.द.शे. आठ टक्क्यांनी २० वर्षांसाठी सुमारे प्रति महिना ६७००० रुपये घरकर्ज हफ्ता येऊ शकतो. म्हणजेच २० वर्षांत एकूण १,६०,६०,००० इतकी रक्कम आपण भरणार असतो. याउलट भाड्यानं घेतलेल्या घरासाठी साधारणपणे १ – १.५ लाख डिपॉझिट व वरील उदाहरणात २५ ते ३५ हजारांच्या घरात दरमहा भाडं पडू शकतं.

– आता सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गुंतवणूक. जी व्यक्ती आपल्या पहिल्या घराचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी कर्ज काढतो त्याला त्या घराची खरंच गरज असते म्हणूनच, परंतु एक घर असताना केवळ पूर्वापार चालत आलेला गुंतवणूक पर्याय कवटाळत आठ ते दहा टक्क्यांनी कर्ज काढून गुंतवणूक करणं म्हणजेच गुंतवणूक शास्त्रातील पहिल्याच नियमाचा भंग केल्यासारखं आहे. १० टक्क्यानं घरकर्ज घेतल्यास, त्यात जर पुढील २० वर्षांचा महागाईचा दर (सुमारे सात टक्के) जोडल्यास या अशा गुंतवणुकीमधून कमीतकमी परतावा प्रतिवर्षी १७ टक्के हवाच. म्हणजेच त्या घराची विक्रीपश्चात किंमत २० वर्षांनंतर कमीतकमी २५ कोटी रुपये असावयास हवी तरच समजता येईल की, त्या गुंतवणुकीतून तुम्हास तोटा झाला नाही. कारण केवळ व्याज व महागाई एवढंच गृहीत धरून हे गणित मांडलं आहे. त्यात केवळ प्रतिवर्षी पाच टक्के परताव्याची अपेक्षा ठेवल्यास हीच रक्कम ५८ कोटींच्या घरात जाते. आता सूज्ञ वाचकांनी घरकर्जासमोर मिळणारा करासंबंधीचा फायदा (टॅक्स बेनिफिट) असा किती तो वजा करावा, जो फायदा यापुढं लुप्त होण्याच्या मार्गावर आहे.

आता इथं विक्रीपश्चात म्हणण्याचा अर्थ म्हणजे २० वर्षांची जुनी सदनिका घेण्यास व ताबडतोब पैसे मिळण्यास वेळ लागू शकतो (लिक्विडीटी). जरी घेणारी व्यक्ती तयार असेल तरी जुन्या सदनिकेवर फारतर ५० ते ६० टक्के पर्यंतच कर्ज मिळू शकतं म्हणजेच बाकीची ५० टक्के रक्कम उभी करण्यात वेळ लागू शकतो अथवा अडचणी येऊ शकतात. जरी समजा घर खरेदीदाराकडं बचतीमधून रोख रक्कम देऊ करण्याची आर्थिक तयारी असेल तर ती व्यक्तीदेखील भावात घासाघीस करण्यास तयार असू शकते, म्हणजे पुन्हा आपणांस इच्छुक किंमत मिळण्याची शक्यता कमी होत जाते.

**✻ घर खरेदी करून त्यात राहणं व भाड्याच्या घरात राहण्याचे काही थेट फायदे/तोटे :**

१. मूर्त मालमत्ता बनते.

२. स्वतःच्या घरखरेदीमुळं मनात सुरक्षितता व अभिमानाची भावना निर्माण होते.

३. भाडे हा एक मासिक खर्च आहे ज्यामधून कोणतीही मूर्त अशी भौतिक संपत्तीनिर्मिती होत नाही.

४. जेव्हा तुम्ही भाड्यानं घेता, तेव्हा तुम्हाला काहीवेळा घर बदलावं लागतं ज्यामध्ये वेळ, पैसा आणि शक्ती वाया जाते, परंतु तुमच्या मालकीच्या घराबाबतीत असं होत नाही.

५. घरभाडं हे काही वर्षांनी वाढू शकतं.

**✻ भाड्यानं घर घेण्याचे इतर फायदे/तोटे–**

१. नोकरीत बदल किंवा नोकरी सोडून व्यवसाय, असे धाडसी निर्णय घेण्यास असक्षमता.

२. मोठ्या ईएमआयचं ओझं नसतं. त्याचबरोबर मालमत्ता कर व घराच्या मालकीच्या इतर कायदेशीर समस्यांच्या कटकटीपासून बचाव.

३. प्रतिमाह खर्च ईएमआयच्या तुलनेत खूप कमी. (वरील उदा. ६७ हजार ईएमआय वि. ३५ हजार घरभाडं).

४. वाढत्या घरभाड्यावर मात करण्यासाठी मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणं उरलेली रक्कम (६७ हजार वजा ३५ हजार) म्हणजेच दरमहा ३२ हजार रुपये अशा मालमत्ता वर्गात गुंतवल्यास ज्यामधून केवळ १५ टक्के परतावा मिळू शकतो, त्यामधून २० वर्षांनंतर मिळणारी रक्कम ४.२५ कोटींच्या घरात जाते.

५. नोकरीत बदल झाल्यास भाड्याचं घर लगेच सोडता येऊ शकतं जे स्वतःच्या घराबाबतीत होऊ शकत नाही आणि मग आयुष्यभर त्यासाठी इतर गोष्टींशी तडजोड करावी लागते.

वरील सर्व गोष्टी विचारात घेता, घरामध्ये गुंतवणूक करणं याबद्दलचं चित्र स्पष्टच होतं, मात्र स्वतःचं (पाहिलं) घर घेणं आणि भाड्याच्या घरात राहणं हा निव्वळ भावनांचा खेळ होऊ शकतो. समझने वालोंको इशारा काफी हैं...

# अवकाळीने गुरांच्या वैरणीचा प्रश्न गंभीर

**पेण : प्रतिनिधी**

समुद्रात सतत निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे गेले दोन महिने अवकाळी पावसाने संपुर्ण राज्याला वेठीस धरून शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान केले आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार १७ नोव्हेंबरपासून अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे पेण तालुक्याच्या ग्रामीण भागातील कापलेली भातशेती भिजून गेली आहे. चाऱ्यासाठी लागणारी वैरण (पेंढा) भिजल्यामुळे दुर्गंधी सुटून गुरांना खाण्यास अयोग्य ठरली आहे. अवकाळी पावसामुळे भातपिकाची वैरण पूर्णपणे नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.


(छाया : अनिस मनियार)

पेण तालुक्यातील बेलवडे, तरणखोप, मुंगोशी, शेणे, धामणी, आंबेघर, सावरसई, सापोली, हेमडी, मांगरूळ, कामार्ली, मळेघर, बोरगाव, रोडे– कश्मिरे या गावांमध्ये पशुपालकांची संख्या मोठी आहे. येथून पेण शहराला दररोज मोठ्या प्रमाणात दुध व दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठा होत असतो. यंदाचा खरीप हंगामात भाताचे चांगले उत्पन्न आले होते. त्यामुळे गुरांचा वैरणीचा प्रश्न उद्भवत नव्हता. परंतु ऑक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यात अवकाळी पावसाचा तडाखा बसून भातशेतीचे नुकसान झाले. अवकाळी पडणाऱ्या पावसाने धान्य आणि पेंढा अशा दोन्ही प्रकारे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. गुरांसाठी लागणारी वैरण अवकाळी पावसात भिजल्याने आता वापरायोग्य राहिली नाही. त्यामुळे गुरांच्या वैरणी अभावी पशुधन पालकांची मोठी गैरसोय होणार असून वैरणीची मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवणार आहे.

# व्यापाऱ्यांना लुटणाऱ्या दोघा आरोपींना सहा वर्षे सक्तमजुरी

**माणगाव, पाली : प्रतिनिधी**

शस्त्राचा धाक दाखवून व्यापाऱ्यांना लुटणाऱ्या दोघा आरोपींना माणगाव येथील सत्रन्यायालयाने गुरुवारी (दि. १९) सहा वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

आरोपी हरिश्चंद्र गुडेकर याने सोन्याची देवाणघेवाण करण्याचा व्यवहार करण्यासाठी रमेश भिकमचंद परमार व इतर चार व्यापाऱ्यांना १५ मार्च २०१६ रोजी पाली (ता. सुधागड) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धोंडसे गावाजवळील दळवी फॉर्महाऊस येथे बोलावले होते. त्यानुसार रमेश परमार व इतर व्यापारी तेथे सोने खरेदीसाठी आले असता त्यांना विनोद विष्णू गुडेकर व इतर सहा आरोपींनी मारहाण केली तसेच पिस्तुलचा धाक दाखवून त्यांचे हातपाय बांधून त्यांच्याकडील एक कोटी १४ लाख रुपये, सोन्याची चैन, घड्याळ व मोबाइल फोन व गाड्यांच्या चाव्या काढून घेतल्या. या व्यापाऱ्यांना एक रूममध्ये बंद करून आरोपींनी पोबारा केला होता. या प्रकरणी पाली पोलीस ठाण्यात भादविसं कलम ३९५,३९७,१२०–ब सह भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तत्कालीन पोलीस निरीक्षक अशोक व्हि. पवार यांनी या गुन्ह्याचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

**माणगाव सत्र न्यायालयाचा निर्णय**

सदर खटल्याची सुनावणी माणगाव सत्रन्यायालयात झाली. सदर खटल्यामध्ये सहाय्यक सरकारी वकील



जितेंद्र म्हात्रे साक्षीदार तपासले व न्यायालयासमोर प्रभावीपणे युक्तिवाद केला. सत्र न्यायाधीश एन. एस. कोले यांनी आरोपी विनोद विष्णू गुडेकर व संतोष तुकाराम महाडीक यांस दोषी ठरवून सहा वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. उर्वरीत आरोपीना निर्दोष मुक्त केले.

# द्रुतगती मार्गावर चार वाहनांचा अपघात; एक ठार; सहा जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील ढेकु गावाच्या हद्दीत शुक्रवारी (दि. १९) रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास भरधाव ट्रकने तीन कारना धडक दिली. या अपघातात एक ठार तर सहा प्रवासी जखमी झाले. गंभीर जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बाळू रा निवगुणे हा कॉलीस कारचा चालक ठार झाला. क्वॉलीस कार मधील तीन इसम गंभीर जखमी व इरटिगा कार मधील तीन किरकोळ जखमी झाले

तमिळनाडूहून आलेला भरधाव ट्रक (एमएच–४६,एएल–५२१५) द्रुतगती महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जात होता. ढेकू गावच्या हद्दीत या ट्रकने पुढे जाणाऱ्या इरटिगा कार (एमएच–४६,झेड–५२१५), स्कॉंडा कार (एमएच–१७,बिएक्स–७७७३) व क्वालीस कार (डिएन–०९,सी–४५१) यांना जोरदार ठोकर दिली. या अपघातात क्वॉलीस कारचा चालक बाळू रा. निवगुणे (वय ६७, रा. काशेडी वेल्हे, जि. पुणे) गंभीर जखमी होवून जागीच ठार झाला. तर कारमधील मारुती निवगुणे (वय ७९), सुभाष निवगुणे (वय ५२), शशिकांत जाधव (वय ५५, सर्व रा. काशेडी वेल्हे, जिल्हा पुणे), मनीष चव्हाण (वय १८), शिवपाल (वय १९, दोघे रा. उत्तर प्रदेश) हे प्रवासी किरकोळ जखमी झाले. किरकोळ जखमींना खोपोलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात तर गंभीर जखमींना कामोठे येथील एमजीएम हॉस्पीटल दाखल करण्यात आले आहे. या अपघातात तीन कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.


(छाया : अरुण नलावडे)

## नागरिकांनी मतदार नोंदणी, दुरुस्ती करून घ्यावी –स्वप्नाली डोईफोडे

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील जनतेने मतदार नोंदणी व दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी केले आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत पात्र मतदारांची नोंदणी करण्यात येत असून पेण तालुक्यात २७ व २८ नोव्हेंबर रोजी विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या विशेष मोहिमेच्या कालावधीत प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार नोंदणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

पेण तालुक्यातील जास्तीत जास्त युवक व युवतींनी मतदान केंद्राला भेट देऊन आपले नाव मतदार यादीत नोंदविण्यासाठी नमुना नं ६ भरुन द्यावे. असे आवाहन तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

### भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्या वाढदिवसानिमित्त

# मुरूड पालिका कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्या वाढदिवसानिमित्ताने शनिवारी (दि. २०) जिल्हा कार्यकारिणी सदस्य तथा ज्येष्ठ नेते जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे यांच्यातर्फे मुरुडमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.


(छाया : संजय करडे)

मुरूड शेगवाडा येथील भाजपच्या जनसंपर्क कार्यालयात ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांच्यातर्फे शनिवारी नगर परिषद कर्मचारी व सफाई कामगारांना मान्यवरांच्या हस्ते मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी ॲड. महेश मोहिते यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. भाजपचे मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष महेश मानकर, बाळा भगत, नरेश वारगे, प्रवीण बैकर, उमेश माळी, नसिम हनिफ उलडे, किशोर म्हसाळकर, सुनील खेऊर, संतोष खुडे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये शत्रूंजय भावयात्रेने चतुर्मासाची सांगता

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील जैन समाजाच्या चतुर्मासाची सांगता पालिताना येथील शत्रूंजय भावयात्रेने करण्यात आली. यावेळी जैन बंधू,भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कर्जत शहरातील प्रवीण तथा चिंटू ओसवाल यांच्या कुटुंबीयांनी या सोहळ्याचे यजमानपद स्वीकारले होते. दिव्या प्रभाश्रीजी, मोक्षर्थ रुची (कर्जत), झिना दर्शिती, मैत्री दर्शिती, उज्वला दर्शिती, जोनेश प्रिया, नैगम प्रिया, हितार्थ रुची, मोक वितराग रुची, लक्ष रुची या दहा जैन साध्वी कर्जतमध्ये चार महिन्यांपूर्वी चातुर्मासासाठी आल्या होत्या. चतुर्मासाच्या सांगता सोहळ्याच्या दिवशी त्यांना जैन मंदिरातून ओसवाल यांच्या घरी वाजत गाजत आणून त्यांची यथोचित पूजा करण्यात आली. त्यानंतर त्यांना समारंभाच्या ठिकाणी राज कॉटेजच्या सभागृहात आणण्यात आले.

प्रारंभी धार्मिक सोहळा करण्यात आला. मोठ्या पडद्यावर गुजराथमधील पालिथाना तीर्थक्षेत्राची प्रतिकृती साकारण्यात आली होती. या तीर्थक्षेत्रातील शत्रूंजय भाव यात्रेची कहाणी निरव शहा यांनी खास शैलीत सादर केली. त्यानंतर गायक पार्थ वखारीया यांनी गीतातून या तीर्थक्षेत्राची महती सादर केली. त्यांना डॉ. साकेश शहा यांनी कीबोर्डवर, ऍक्टोपॅडवर रवी भोसले आणि प्रशांत भोसले यांनी तबल्यावर साथसंगत केली. यावेळी जैन श्वेतांबर संघाचे अध्यक्ष जयंतीलाल ओसवाल, रणजीत जैन, हिम्मतलाल ओसवाल, साजन ओसवाल, मंगल परमार, राजू ओसवाल यांच्यासह जैन बंधू,भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सुधागडात मासळीची आवक वाढली, भावही उतरले

## मत्य खवय्यांची चंगळ; पर्यटकांनाही मेजवानी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील बाजारात नियमित ताजी मासळी उपलब्ध होत आहे. ती खरेदीसाठी खवय्यांच्या उड्या पडत आहेत. समुद्रात सध्या मोठ्या प्रमाणात मासळी सापडत आहे. त्यामुळे मासळीची आवक वाढली आहे. परिणामी मासळीचे भाव मागील महिन्याच्या तुलनेत २० ते ३० टक्क्यांनी उतरले आहेत. ८०० ते १००० रुपये किलोने मिळणारे पापलेट, सुरमई व रावस आता जेमतेम ६०० ते ७०० रुपये किलोने मिळत आहेत. शिवाय विविध जाती व प्रकारचे मासे मिळत असल्याने खवय्यांची चंगळ झाली आहे. सध्या मोठ्या प्रमाणात येणाऱ्या पर्यटकांनादेखील स्वस्तात चांगली मासळी मिळत आहे.

ओले बोंबील, मांदेली, कोळंबी मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने त्यांचे भावदेखील खूप उतरले आहेत. चांगली आवक होत असल्याने मासळीचे भाव उतरले आहेत. सध्या माशांची स्वस्ताई असल्याने खवय्ये व पर्यटक मोठ्या प्रमाणात मासळी खाण्याचा आंनद घेत आहेत. सुरमई, रावस, टोळ, कर्ली, घोळ व पापलेट हे अधिक मागणी असलेले महागातले मासे बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत.

**मोठ्या प्रमाणात मासेमारी सुरू झाल्याने माशांची आवक वाढली आहे. मागच्या महिन्यापेक्षा या महिन्यात मासळीचे दर कमी झाले आहेत. त्यामुळे खवय्ये खूप खुश आहेत.**

**–गौरी मनोरे, मासळी विक्रेत्या, पाली, ता. सुधागड**

**सध्या ताजी मासळी मोठ्या प्रमाणात व स्वस्तात मिळत आहे. त्यामुळे मासे खरेदीवर अधिक भर आहे.**

**–गिरीश काटकर, ग्राहक, पाली, ता. सुधागड**

**मासळी दर प्रतिकिलो**

| प्रकार | सध्या | मागील महिन्यात |
|---|---|---|
| बोंबील | २०० | ३०० रुपये |
| पापलेट मध्यम | ६०० | ८०० ते १००० |
| पापलेट मोठे | ८०० | १००० ते १२०० |
| सुरमई | ८०० | १००० ते १२०० |
| घोळ | ८०० | १००० ते १२०० |
| रावस | ७०० | १००० |
| मांदेली | १०० | १५० |
| कोलंबी | ४०० | ६०० |
| बांगडा | २५० | ४०० |
| हलवा | ४०० | ८०० |
| टोळ | ३०० | ४०० |
| कुपा | २०० ते ३०० | ४०० |
| पोचे | ८०० | १०० |


(छाया : धम्मशील सावंत)

# नेरळमधील नेत्रचिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ४० जणांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**कर्जत : बातमीदार**

आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व लोटस फाउंडेशन कर्जत यांच्या संयुक्त पुढाकारातून नेरळमधील साई सन्मान हॉटेल येथे नेत्रचिकित्सा शिबिर घेण्यात आले. या शिबिरात २१६ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

या नेत्रचिकित्सा शिबिराचा फायदा नेरळ परिसरातील आदिवासी वाड्यांमधील लोकांनी घ्यावा, यासाठी लोटस फाउंडेशनचे अध्यक्ष मंगेश म्हसकर, किरण ठाकरे, राजेश भगत, संजय कराळे, नरेश मसने, नितीन कांदळगावकर, राहुल कुलकर्णी यांनी जनजागृती केली होती. या शिबिरात २१६ रुग्णांनी नेत्रचिकित्सा करून घेतली. त्यातील ४० रुग्णांना मोतीबिंदू दोष आढळून आल्याने त्यांच्यावर नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

भाजप किसान मोर्चाचे कोकण संघटक सुनील गोगटे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, कर्जतचे नगरसेवक बळवंत घुमरे, नेरळच्या सरपंच उषा पारधी, ग्रामपंचायत सदस्य राजन लोभी, श्रद्धा कराळे, संतोष शिंगाडे, नेरळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, तसेच अनिल जैन, मिलिंद साने, अनिल पटेल, प्रकाश पेमारे, वर्षा बोराडे, स्नेहा गोगटे, संदीप म्हसकर, योगेश ठक्कर, अरुण नायक, धनंजय धुळे आदींनी नेत्रचिकित्सा शिबिराला भेट दिली.


(छाया : संतोष पेरणे)

(छाया : विनायक माडपे)




# खालापुरात महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

कल्पना प्रभाकर चेंबूरकर बहुउद्देशीय संस्था, महिला आर्थिक विकास महामंडळ (रायगड) तसेच प्रगती लोकसंचालित साधन केंद्र (कर्जत) यांच्या संयुक्त विद्यमाने खालापूर गावातील हनुमान मंदिरात मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात रक्तदाब, थायराइड, मधुमेह, हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

या शिबिराचे उद्घाटन माविमच्या डीसीओ वर्षा पाटील, एमएमआय अधिकारी दीपक पोटभरे, संस्थेच्या अध्यक्षा हेमाताई चिंबुळकर, उपाध्यक्षा श्रावणी वायचल, कल्पना चिंबुलकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे सहाय्यक अशोक लोंढे, तृप्ती तांबडे आदी उपस्थित होते. या शिबिरात तपासणी झालेल्या महिलांना यावेळी मोफत औषधाचे वाटप करण्यात आले.

# बौद्ध संस्कृतीची विचारधारा सर्वत्र पोहचवा -भीमराव आंबेडकर

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून धम्म परिषदेचे आयोजन होत असताना समाजाने धम्माचा प्रचार आणि प्रसार करणे आवश्यक आहे. येणाऱ्या काळात बौद्ध संस्कृतीची विचारधारा सर्वत्र पोहचविण्याचे काम करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर यांनी पेण वाशी येथे केले.



(छाया : अनिस मनियार)

पेण तालुका बौद्ध महासभेच्या वतीने नुकतेच वाशी (ता. पेण) येथे एक दिवसीय धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात भीमराव आंबेडकर मार्गदर्शन करीत होते. जगाला शांतीचा मार्ग दाखवणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या विचारांचे आपण पाईक आहोत त्यामुळे त्यांचे विचार समाजाने तेवत ठेवले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोकणात क्रांती घडवली. त्यामुळे कोकणतल्या पेणमधील धम्म परिषदेला येणाऱ्या काळात गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास भीमराव आंबेडकर यांनी या वेळी व्यक्त केला.

तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या धम्म परिषदेला बौद्ध महासभेचे प्रदेशाध्यक्ष भिकाजी कांबळे, समता सैनिक दलाचे प्रमुख अनंत गायकवाड, विजय कांबळे, अशोक केदारे, विजय जाधव, संपदा चव्हाण, विजय गायकवाड, कोषाध्यक्ष मारुती शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

पेण तालुक्यातील ५२ महिला उपासकांचा यावेळी भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते यथोचित सन्मान करुन त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# ‘किवीं’विरुद्ध भारताची सरशी

## टी-२० मालिकेत विजयी आघाडी; आज तिसरी लढत

**रांची : वृत्तसंस्था**

मध्यमगती गोलंदाज हर्षल पटेलने (२/२५) पदार्पणाच्या लढतीत न्यूझीलंडच्या ठेवलेला फलंदाजांवर अंकुश आणि त्यानंतर सलामीवीर के. एल. राहुल (४९ चेंडूंत ६५ धावा) आणि कर्णधार रोहित शर्मा (३६ चेंडूंत ५५ धावा) यांनी शतकी भागीदारी रचल्यामुळे भारताने दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडचा सात गडी आणि १६ चेंडू राखून धुव्वा उडवला.



न्यूझीलंडने दिलेले १५४ धावांचे लक्ष्य भारताने १७.२ षटकांत गाठून तीन लढतींच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली. उभय संघातील तिसरा सामना रविवारी (दि. २१) कोलकाता येथे होणार आहे.

राहुल आणि रोहित यांनी सलग पाचव्या लढतीत किमान अर्धशतकी भागीदारी रचताना भारताच्या विजयाचा पाया रचला. राहुलने गेल्या पाच सामन्यांतील चौथे, तर रोहितने मालिकेतील पहिले अर्धशतक झळकावले. टिम साऊदीने या दोघांसह सूर्यकुमार यादवला (१) तीन षटकांत बाद करून सामन्यात रंगत निर्माण केली, परंतु ऋषभ पंतने (६ चेंडूंत नाबाद १२) सलग दोन षटकार लगावून भारताच्या विजयावर थाटात शिक्कामोर्तब केले.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने ६ बाद १५३ धावांपर्यंत मजल मारली. मार्टिन गप्टिल (३१) आणि डॅरेल मिचेल (३१) यांनी अवघ्या २६ चेंडूंत ४८ धावांची सलामी देत भारतावर दडपण टाकले, परंतु दीपक चहरने गप्टिलला बाद केल्यावर हर्षलने लढतीला कलाटणी दिली. त्याने मिचेल आणि ग्लेन फिलिप्स (३४) यांचे महत्त्वपूर्ण बळी मिळवले. अक्षर पटेल (१/२६) आणि रविचंद्रन अश्विन (१/१९) या फिरकी जोडीनेसुद्धा मधल्या फळीत धावा रोखण्याची भूमिका चोख बजावली.

**संक्षिप्त धावफलक**

न्यूझीलंड : २० षटकांत ६ बाद १५३ (ग्लेन फिलिप्स ३४, मार्टिन गप्टिल ३१; हर्षल पटेल २/२५) पराभूत वि. भारत : १७.२ षटकांत ३ बाद १५५ (के. एल. राहुल ६५, रोहित शर्मा ५५; टिम साऊदी ३/१६). सामनावीर : हर्षल पटेल.

इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा

## सिंधू, श्रीकांत उपांत्य फेरीत


**बाली : वृत्तसंस्था**

भारताचे आघाडीचे बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू आणि किदम्बी श्रीकांत यांनी इंडोनेशिया मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेमधील विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरी गाठली आहे.

या स्पर्धेचे तिसरे मानांकन लाभलेल्या विश्वविजेत्या सिंधूने महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत टर्कीच्या नेस्लिहान यिगिटवर ३५ मिनिटांत २१-१३, २१-१० असा विजय मिळवला. सिंधूचा उपांत्यपूर्व फेरीपर्यंतचा प्रवास सुकर झाला असला तरी उपांत्य फेरीत तिच्यापुढे जपानच्या अग्रमानांकित अकाने यामागुचीचे खडतर आव्हान असेल.

पुरुष एकेरीत अनुभवी श्रीकांतने भारताच्याच एचएस प्रणॉयला २१-७, २१-१८ असे नामोहरम केले. श्रीकांतने जुन्या लयीत खेळ दाखवताना पहिल्या गेममध्ये फक्त सात गुण प्रणॉयला दिले. ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या व्हिक्टर एक्सेलसेनवर धक्कादायक विजय मिळवणाऱ्या प्रणॉयने दुसऱ्या गेममध्ये सामना वाचवण्याचा कसोशीने प्रयत्न केला, परंतु तो अपयशी ठरला.

## आरोग्य प्रहर



## पोटाच्या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी ‘या’ टिप्स करा फॉलो!

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये आपण आरोग्याकडे लक्ष देत नाहीत. आयुर्वेदात म्हटले आहे की, निरोगी व्यक्ती तोच असतो ज्याचे पाय उबदार, पोट मऊ आणि डोके थंड असते, पण आजच्या काळात सर्वकाही उलटे झाले आहे. चुकीचे अन्न, जास्त ताण इत्यादींचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत आहे. विशेषत: पोटाच्या समस्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते पोट हे सर्व रोगांचे मूळ मानले जाते. त्याची योग्य काळजी घेतली तर माणूस सर्व समस्यांपासून स्वतःला वाचवू शकतो. येथे जाणून घ्या काही खास मार्ग जे तुमच्या पोटातील गॅस, अपचन, पोटदुखी, ॲसिडिटी इत्यादी सर्व समस्या दूर ठेवण्यास मदत करतात.

तज्ज्ञांच्या मते, तांब्याच्या भांड्यात ठेवलेले पाणी पोटाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. या पाण्याने सकाळची सुरुवात केल्यास पोटाच्या सर्व समस्या दूर होतात. सकाळी उठल्याबरोबर हे पाणी प्या. यासाठी पाणी रात्रीच एका भांड्यात ठेवा आणि सकाळी उठल्यावर प्या. तांब्यामध्ये असे अनेक घटक असतात, जे पोटासाठी फायदेशीर मानले जातात.

फायबरयुक्त आहार पचनसंस्था मजबूत करण्याचे काम करते. पचनसंस्था मजबूत राहिल्याने तुमचे अन्न चांगले पचते आणि पोटाचे आरोग्य चांगले राहते. त्यामुळे फळे, धान्य, हिरव्या भाज्या, शेंगा इत्यादींचा आहारात समावेश करा. रात्री उशिरा जेवणे टाळाच.

पोटाच्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोमट पाणीदेखील खूप उपयुक्त मानले जाते. रोज जेवणाच्या अर्ध्या तासानंतर कोमट पाणी प्यायल्याने पचनक्रिया चांगली होते. दररोज सकाळी रिकाम्या पोटीदेखील गरम पाणी पिले पाहिजे.

योगसाधना पोटाच्या आरोग्यासाठी खूप मानला जातो. तसेच सकाळ-संध्याकाळ चाला. जेवणानंतर संध्याकाळचा फेरफटका मारा. सकाळी जलद चालण्याचा वेग ठेवा, पण संध्याकाळी चालण्याचा वेग वाढवू नका. रात्रीचे जेवण झाल्यानंतर किमान २० मिनिटे तरी चाला.

## पेणमध्ये आज भव्य पॉवर लिफ्टिंग स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पॉवरलिफ्टींग असोसिएशनच्या मान्यतेने श्री हनुमान व्यायामशाळा व पेण श्री फिटनेस सेंटरच्या वतीने पेणमध्ये रविवारी (दि. २१) महिला व पुरुषांसाठी भव्य क्लासिक पॉवर लिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन हनुमान व्यायाम शाळेच्या पटांगणावर करण्यात आले आहे.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील स्पर्धकांनाच भाग घेता येणार असून स्पर्धेसाठी वजन तपासणी सकाळी ८ ते १० वेळेत होईल. स्पर्धकांनी येताना आपले ओळखपत्र, आधार कार्ड घेऊन तसेच मास्क घालून येणे. जे स्पर्धक रायगड डिस्ट्रिक्ट पॉवरलिफ्टिंग संघटनेतून खेळतात अशाच स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेता येईल, असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी राष्ट्रीय खेळाडू बॉडी बिल्डिंग व परीक्षक राजेश अनगत, रोशन पाटील व त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.


स्पर्धेत भाग घेण्यासाठी राजेश अनगत (९१४५५२२४०५), रोशन पाटील (८९५६१६७७७७), सचिव अरुण पाटकर (९६९८५२९८६), सहसचिव सचिन भालेराव (९८७०९६२२८८) आदींशी संपर्क साधावा. सर्व स्पर्धकांनी कोरोना नियमांचे पालन करून व वेळेवर उपस्थित राहून स्पर्धा यशस्वी करण्यात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमच्यासाठी ही दिलासादायक गोष्ट!

## डिव्हिलियर्सच्या निवृत्तीनंतर राशिद खानची पोस्ट व्हायरल

**काबूल : वृत्तसंस्था**

स्फोटक फलंदाज एबी डिव्हिलियर्सने शुक्रवारी सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. तो आयपीएल २०२२चा भागही असणार नाही. अफगाणिस्तान आणि सनरायझर्स हैदराबादचा स्टार गोलंदाज राशिद खान याने डिव्हिलियर्सच्या निवृत्तीवर खास प्रतिक्रिया दिली आहे.



दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार डिव्हिलियर्सने २०१८मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला होता. यानंतर त्याने आपले संपूर्ण लक्ष जगभरातील टी-२० लीगवर केंद्रित केले. आयपीएलमध्ये तो विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) फ्रेंचायझीचा एक भाग होता.

२००४मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या डिव्हिलियर्सने ११४ कसोटी, २२८ एकदिवसीय आणि ७८ टी-२० सामन्यांमध्ये दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधित्व केले. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वांत जलद अर्धशतक, शतक आणि १५० धावा करण्याचा विक्रम त्याच्या नावावर आहे. मिस्टर ३६० डिग्री नावाने प्रसिद्ध असलेल्या डिव्हिलियर्सने आपल्या कारकिर्दीत जागतिक दर्जाच्या गोलंदाजांना ज्या प्रकारे मात दिली, त्यामुळे गोलंदाजांच्या मनातही त्याच्या नावाची भीती निर्माण झाली.

स्टार गोलंदाज राशिद खान याने, ‘माझ्यासाठी आणि सर्व गोलंदाजांसाठी निश्चितच दिलासादायक गोष्ट आहे. अद्भूत आठवणी आणि माझ्यासोबत अनेक तरुणांना प्रेरणा दिल्याबद्दल धन्यवाद. आम्ही तुला नक्कीच मिस करू,’ असे आपल्या ट्विटरवर म्हटले.


# रोहित शर्माचा विक्रमांचा ‘षटकार’

**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्माने भारतीय टी-२० संघाचा पूर्णवेळ कर्णधार म्हणून शानदार सुरुवात केली आहे. टीम इंडियाने दुसऱ्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडचा सात विकेट्सने पराभव केला. यासह संघाने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली. या सामन्यात रोहितने अर्धशतकी (५५ धावा) खेळी करीत सहा मोठे विक्रम केले.

**२९व्यांदा ५०पेक्षा जास्त धावा**

या सामन्यात रोहित शर्माने अर्धशतक झळकावले. आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये त्याने २९व्यांदा ५०पेक्षा जास्त धावा केल्या. हा एक विक्रम आहे. विराट कोहलीनेही सर्वाधिक २९ वेळा हा पराक्रम केला आहे. रोहितने चार शतके आणि २५ अर्धशतके केली आहेत. कोहलीला आतापर्यंत एकही शतक झळकावता आलेले नाही. आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये सर्वाधिक शतकांचा विश्वविक्रम रोहितच्या नावावर आहे.



**शतकी भागीदारी**

या सामन्यात रोहित शर्मा आणि के. एल. राहुलने शतकी भागीदारी केली. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये या दोघांची ही पाचवी शतकी भागीदारी आहे. हाही एक विक्रमच आहे. पाकिस्तानच्या बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांनीही जोडी म्हणून सर्वाधिक पाच वेळा शतकी भागीदारी केली आहे.

**आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४५० षटकार**

या सामन्यात रोहित शर्माने पाच षटकार ठोकले. त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४५४ षटकार आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर किमान ४५० षटकार मारणारा तो पहिला भारतीय, तर जागतिक तिसरा फलंदाज ठरला आहे.

**संघाच्या विजयात योगदा**

रोहित शर्मा ५०पेक्षा जास्त धावा करून संघाला २५व्यांदा आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात विजय मिळवून देणारा पहिला खेळाडू ठरला आहे. विराट कोहली २० वेळा हा पराक्रम करून दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**भागीदारीत विक्रम**

रोहित शर्माने १३ वेळा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये खेळाडू म्हणून १००हून अधिक धावांची भागीदारी केली आहे. हादेखील एक विक्रमच आहे.

**कर्णधार म्हणून विक्रम**

रोहित शर्मा हा घरच्या मैदानावर सर्वांत कमी सामन्यांमध्ये १० विजय मिळवणारा भारतीय कर्णधार बनला आहे. त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने घरच्या मैदानावर ११ पैकी १० टी-२० सामने जिंकले आहेत.

आशियाई अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत

## भारताला दोन रौप्यपदके

**ढाका : वृत्तसंस्था**

भारतीय तिरंदाज बलाढ्य कोरियाचा अडथळा ओलांडण्यात पुन्हा अपयशी ठरले. आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष आणि महिला सांघिक गटाचे अंतिम सामने गमावल्यामुळे दोन रौप्यपदकांवर समाधान मानावे लागले.

पुरुष रिकर्व्ह सांघिक गटात कपिल, प्रवीण जाधव आणि पार्थ साळुंखे यांनी कोरियाविरुद्ध २-६ अशी हार पत्करली. कोरियाच्या संघात ली सेऊंग्युन, किम पिल-जूंग आणि हॅन वू टॅक यांचा समावेश आहे. अंकिता भाकट, मधून वेदवान आणि रिद्धी यांचा समावेश असलेल्या महिला रीकर्व्ह संघाने कोरियापुढे ०-६ अशी शरणागती पत्करली.






आशियाई करंडक हॉकी स्पर्धा

## सविताकडे नेतृत्व, राणीला विश्रांती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुढील महिन्यात होणाऱ्या महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स करंडक हॉकी स्पर्धेसाठी कर्णधार राणी रामपालला विश्रांती देण्यात आली असून उपकर्णधार सविताकडे १८ सदस्यीय भारतीय संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे.

डोंगहे (दक्षिण कोरिया) येथे ५ ते १२ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत चीन, कोरिया, जपान, थायलंड आणि मलेशिया या संघांचा समावेश आहे. राणी बंगळुरू येथे दुखापतीतून सावरत असून अनुभवी बचावपटू दीप ग्रेस एक्काची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत चौथ्या क्रमांकापर्यंत मजल मारणाऱ्या भारतीय संघातील बचावपटू लालरेम्सियामी, शर्मिला देवी, मध्यरक्षक सलिमा टेटे या तिघींना चॅम्पियन्स करंडक स्पर्धेसाठी विश्रांती देण्यात आली आहे.

**असा आहे संघ** : सविता (कर्णधार), रजनी ईटिमार्पू, दीप ग्रेस एक्का, उदीता, निक्की प्रधान, गुर्जित कौर, निशा, सुशिला चानू पुखरम्बाम, नमिता टोप्पो, मोनिका, नेहा, ज्योती, लिलिमा मिन्झ, नवनीत कौर, वंदना कटारिया, रर्जंवदर कौर, मिरयाना कुजूर, सोनिका.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com